स्वामी विवेकानंदाचीं पत्रें.

किंमत ०-४-०.

स्वामी विवेकानंद यांचीं
खासगी पत्रें.

किंमत ८ आणे

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ४६ वें.

स्वामी विवेकानंद यांचीं खासगी पत्रें.

प्रथम खंड.

"आतां हा आळस झाडून टाका व अद्वैतसिद्धान्ताचें प्रत्यक्ष आचरण करून दाखवा. नाहीं तर प्रळयकाळपर्यंत असेच साऱ्या जगाच्या उपहासास पात्र व्हा!"

—स्वामी रामतीर्थ.

[प्रथमावृत्ति.]

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव-मुंबई.

किंमत ०-४-०.] सर्व हक्क स्वाधीन. [जानेवारी १९१०.

Printed at the Nirnaya Sagar Press,
by B. R. GHANEKER, for the publishers:
Manoranjak Grantha Prasarak Mandali,
BOMBAY.

प्रकाशकांचे दोन शब्द.

'प्रबुद्ध भारत' मासिकाचे संपादकांनीं स्वामी विवेकानंद यांचीं कांहीं खासगी पत्रें मिळवून त्यांतील कित्येक 'प्रथम खंड' ह्मणून प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांचेंच हें मराठी रूपांतर महाराष्ट्र वाचकांस आह्मी आदर करित आहों.

मूळ इंग्रजींत हीं पत्रें वाचित असतां स्वामींबद्दल वाचकाचा जो ग्रह होतो, त्याची छाया निवळ मराठी वाचकावरहि उमटावी व स्वामींच्या विचारांबरोबरच त्यांच्या मनोवृत्तीचीहि ओळख पटावी अशा हेतूनें हें रूपांतर केलें असल्यामुळें मुळाबरहुकुम, निवळ शब्दास शब्द, असें भाषांतर केलेलें नाहीं. हा प्रयत्न कितपत सिद्धीस गेला आहे हें पाहणें वाचकांचें काम आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या हजारों वाचकांपैकीं एखाद्याच्याहि मनांत स्वामींनीं दाखविलेल्या मार्गानें जाण्याची इच्छा झाली, तर स्वामींच्या आत्म्यास खास आनंद होईल व त्याचा थोडा तरी अंश प्रकाशकांच्याहि वांट्यास येईल.

स्वामी विवेकानंद यांचे आणखी कांहीं लेख मराठींत प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. पण परमेश्वराची कृपा व वाचकांचें औदार्य या संयोगावरच ही इच्छा फलद्रूप होणें अवलंबून आहे.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,
गिरगांव–मुंबई,
ता. १ जानेवारी–१९१०.

काशीनाथ रघुनाथ मित्र,
व्यवस्थापक.

स्वामी विवेकानंद यांचीं खासगी पत्रें.

पत्र १ लें.

ता० २७ एप्रिल, १८९३.

प्रियबंधु—

आपलें पत्र आतांच पावलें. बिचाऱ्या बी—च्या मुलास देवाज्ञा झाली, हें वाचून फार वाईट वाटलें. ईश्वरानें दिलें आणि त्यानेंच नेलें, मर्जी त्याची! पण तें कांहीं नष्ट झालें नाहीं, होणें शक्य नाहीं, व पुढेंहि कधीं नष्ट होणार नाहीं, हें आह्मांला माहीत आहे. तेव्हां याच विचारानें चित्ताचें सांत्वन करून आलेल्या स्थितीस पूर्ण समाधानानें तोंड देणें, एवढेंच आपलें कर्तव्य होय. सेनापतीनें तोफांच्या भर माऱ्यांत पुढें जाण्याविषयीं हुकूम दिला ह्मणजे खऱ्या शिपायानें न कुरकुरतां हुकुमाची अंमलबजावणी करणें, एवढेंच त्याचें काम. असो. अशा दुःखमय स्थितींत बी—चें शांतवन करणारा तो दीनदयालु समर्थ आहे. मी आतां लवकरच जलपर्यटनास निघेन व त्याबद्दलची सर्व व्यवस्था मीं मुंबईस करून ठेविली आहे. राजेसाहेब अथवा माझे दुसरे गुरुबंधु माझ्या जाण्यास अडथळा करणार नाहींत असें बी—स सांगावें. राजेसाहेबांचें तर मजवर निःसीम प्रेम आहे.

ईश्वर आपणास नेहमीं सुखी राखो अशी इच्छा सदैव धारण करणारा,

विवेकानंद.

पत्र २ रें.

प्रियबंधु—

'**दिशोऽपि वसनम्**' असा मी मातेच्या उदरांतून बाहेर आलों व जातांनाहि मला तसेंच गेलें पाहिजे. 'ईश्वरानें दिलें व त्यानेंच नेलें, मर्जी त्याची!' असें एक वृद्ध यहुदी साधु ह्मणत असे. त्या वेळची त्याची परिस्थिति पाहिली, तर तो चोहोंकडून दुःखांनीं अगदीं गांजला होता; तथापि देवावर पूर्ण भरंवसा ठेवून त्यानें आपल्या चित्ताची समता केव्हांहि ढळूं दिली नाहीं. असे प्रसंग हे आपल्या जीवितांतील कसोट्यां-सारखे आहेत. प्रचंड झंझावात सुटून जलनिधीचा क्षोभ झाला ह्मणजे पृष्ठभागावर मोठाल्या लाटा येतात व जातात; पण त्याच्या पोटांत पाहिलें तर अगदीं निःसीम शांततेचें व स्वानंदाचें साम्राज्य असतें. 'ज्यांवर अशीं दुःखें कोसळतात ते **धन्य** होत. कारण, त्यांचें सांत्वन परमेश्वर करील.' असें बायबलांत ह्मटलें आहे. याचें कारण असें आहे, कीं, असे प्रसंग मनुष्यावर कोसळले, ह्मणजे कांहीं काळपर्यंत तो अगदीं हताश व शून्यहृदय होऊन भांबावून जातो. सर्व सृष्टि ह्मणजे केवळ दुःखाचेंच आगर आहे, असा भास झाल्यामुळें जगाशीं असलेला त्याचा संबंध कांहीं काळपर्यंत तरी तुटतो. अशा वेळीं याच स्थितींत त्याची बुद्धि थोडी स्थिरावली ह्मणजे ती अंतर्मुख होऊं लागते व ही अंतर्मुखता पक्की राहिली ह्मणजे मानव-जातीच्या जीविताचें जें कोडें अगम्य ह्मणून वाटत असतें तें उलगडावयास आरंभ होतो. अशा प्रसंगीं जो डगमगून कच खाईल, अथवा परत फिरेल, तो मात्र या चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत पक्का गोंवला गेला, हें निश्चित होय. पण जो धैर्याचा निधि असेल, धीमान् असेल, तो वीर मात्र '**एकं तत् सत् विप्रा बहुधा वदंति**' असें जें सच्चिदानंदस्वरूप त्याच्या सामोरा होईल. नंतर या जीवात्म्यास जखडून टाकणारे दुःखपाश खटाखट तुटून ज्या ठिकाणीं

क्लेशांचें वारेंसुद्धां पोहोंचूं शकत नाहीं, अशा आपल्या मूळच्या सिंहासनावर तो आरूढ होईल.

प्रियबंधु ! तर मग तें हरिनाम केव्हांहि सोडूं नको. कच खाऊन माघारा फिरूं नको. जें जें कांहीं घडतें तें सर्व आपल्या बऱ्याकरितांच आहे, असा पक्का भरंवसा बाळगून त्याबद्दल 'हें असें कां ? आणि तें तसें कां ?' अशी वाचाळपंचविशी न करितां मुकाट्यानें ईश्वराच्या इच्छेस सदैव मान दिला पाहिजे. **'देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो'** हाच जप रात्रंदिवस जपत जा. असें वागतांना केव्हां केव्हां अडचणी येतील, मन उलट खाईल, पण त्या जगज्जननीवरील भरंवसा ढळूं देऊं नको. मन दुर्बल होईल त्या त्या वेळीं त्या परमात्म्याचें चिंतन करित जा. **'मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय'** असा ज्या सारथ्यानें एके वेळीं अर्जुनास उपदेश केला त्यालाच हांक मार, ह्मणजे तोच तुझें सारथ्य करून या दुस्तर संसृतींतून सुखाचा मार्ग तुला दाखवील. कायेनें, वाचेनें व मनानें जें जें करशील तें तें 'श्रीकृष्णार्पणमस्तु' असें ह्मणत जा.

ईश्वरानें तुझें कल्याण करावें, अशी सदैव इच्छा मनांत बाळगणारा,

विवेकानंद.

पत्र ३ रें.

मु० योकोहामा, ता० १० जुलई १८९३.

प्रियबंधु—

आपणास वरचेवर पत्र पाठवून समाचार कळविला नाहीं, याबद्दल माफी असावी. प्रवासांत असलें ह्मणजे कितीतरी वस्तु लागत असतात. त्यांची जमवाजमव करणें आणि त्या जपून ठेवणें याखालींच कितीतरी वेळ जातो. त्यांतून अशा गोष्टींची ज्याला आजन्म संवय नाहीं, अशा माझ्या-सारख्या नवख्या माणसाबद्दल तर विचारावयासच नको! याखालींच माझा जीव अगदीं मट्टचास येतो.

कोलंबो बंदरांत आह्मी एक दिवस होतों. तो दिवस आह्मीं तें शहर पाहण्यांत घालविला. भगवान् बुद्ध निर्वाणास जात आहे अशा थाटाची मूर्ति असलेलें तेथलें एक देऊळच कायतें आतां मला स्मरतें. नंतर आह्मी पिनांग येथें पोहोंचलों. मलाया सामुद्रधुनीच्या एका चिंचोळ्या तुकड्यावर समुद्रकांठीं हा गांव वसला आहे. मलाई लोकांचा धर्म मुसलमानी आहे. पूर्वीं यांचा धंदा चांचेगिरीचा होता व व्यापारी गलबतांस यांची फार भीति वाटत असे; पण आतां सुधारलेल्या देशांचे लढाऊ तरते किल्ले समुद्रांत इतस्ततः संचार करूं लागल्यापासून त्यांचें लक्ष्य अधिक निरुपद्रवी धंद्यांकडे लागलें आहे. पिनांग आणि सिंगापुर यांच्या दरम्यान सुमात्रा बेटांतील उंच उंच पर्वत दृग्गोचर होतात. याच पर्वतांतील दऱ्याखोऱ्यांतून पूर्वीं चांचे लोक रहात असत, असें आमच्या बोटीच्या कप्तानानें मला सांगितलें. सिंगापुर हें स्ट्रेट्स सेटल्मेंटचें राजधानीचें शहर होय.

सिंगापुरास एक जातीचा ताड—ज्याला प्रवाशाचा ताड असें ह्मणतात तो—चोहोंकडे उगवतो. तसेंच भाकरीचीं झाडेंहि येथें रानोमाळ उगवतात. लोकांचा वर्ण सांवळा पण मद्राशांइतका काळा नाहीं.

याच्यापुढें हांगकांग शहर. या ठिकाणीं चिनी लोकांची बरीच वस्ती आहे. येथें मजूर लोक सगळे चिनी व व्यापारहि मुख्यतः चिनी लोकांच्याच हातीं आहे. आमची बोट नांगरतांक्षणींच शेंकडों चिनी होड्यांनीं तिला वेढा दिला. या होड्यांस दोनदोन सुकाणें असल्यामुळें त्या कांहींशा विचित्र दिसतात. ही होडी ह्मणजे एकएका कोळ्याच्या कुटुंबाचें घरच असतें. या कुटुंबांतील घरधनीण बहुधा सुकाणूं संभाळित असते, व बहुधा तिच्या पाठीशीं एखादा छोटा लि हंग चंग बांधलेला असतो. बोटीवर नाना प्रकारचीं कामें आई करित असतां हे छोटे चिनीबुवा चैनीनें निजलेले अथवा मौजेनें हातपाय हालवित असलेले पाहून मौज वाटते. चिनी मूल जरा चालतेंबोलतें झालें, कीं, कामास लागून आपली भाकर आपण मिळवूं लागतें. हिंदी व चिनी लोक हे सुधारलेल्या जगाच्या इतके मागें पडण्याचें एक कारण त्यांचें अत्यंत दारिद्र्य हें आहे. स्वतःच्या हातातोंडाची गांठ ठेवतांठेवतांच एखाद्या साधारण हिंदी अथवा चिनी मनुष्याला इतकें कष्टप्रद होत असतें, कीं, त्यामुळें आपल्या कक्षेच्या बाहेर डोळा फिरविण्याचीसुद्धां त्याला भीति वाटते.

हांगकांग हें शहर फार सुंदर आहे. एका डोंगराच्या थेट शिखरापासून उतरणीवर हा गांव वसला आहे. शिखराकडे हवा जास्त थंड असते. येथें ट्रॅमगाडी आहे व ती वाफेच्या शक्तीनें तारांच्या दोरीनें ओढून चालवितात.

हांगकांग येथें आह्मी तीन दिवस होतों. त्या अवधींत आह्मी क्यांटन शहर पहावयास गेलों. या शहरीं पोहोंचण्याकरितां खाडींतून नदीच्या उगमाकडे सुमारें ८० मैल जावें लागतें. या खाडींत असंख्य होड्या व लहानलहान गलबतें जिकडे तिकडे पसरलेलीं असतात. कांहीं होड्या व्यापारी मालाची नेआण करणाऱ्या असतात व बाकीच्या होड्या ह्मणजे रहावयाचीं घरेंच होत. यांपैकीं कांहीं मोठालीं गलबतें तर दुमजली तिमजली अशीं असतात व त्यांनां बाजूनें ग्यालऱ्या वगैरे असून अशीं कित्येक गलबतें

पुलांनीं जोडलेलीं असतात. या पुलांचा उपयोग रस्त्यांसारखा होतो. ह्मणजे, हें एक लहानसें तरतें गांवच झालें.

चिनी सरकारानें परदेशी प्रवाशांकरितां एक विशिष्ट भूमिभाग राखून ठेविला आहे, तेथें आह्मीं मुक्काम केला होता. क्यांटन शहर नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर वसलें आहे. चिनी लोक जात्या फारच गलिच्छ असतात. स्नान कधींहि न करण्याबद्दल तर त्यांनीं जणूं काय शपथच घेतलेली दिसते! येथील रस्ते इतके अरुंद आहेत, कीं, चालतां चालतां कित्येक वेळीं दुकानांतील पदार्थ दोहोंकडून अंगास लागतात. कित्येक दुकानांत कुत्र्याचें व मांजराचें मांस विक्रीस ठेवलेलें असतें. याचा उपयोग फारच गरीब लोक करतात. उत्तरहिंदुस्थानांतल्याप्रमाणें चिनांत झनान्याचें बंड फार आहे. मजूर वर्गाखेरीज इतर कोणत्याहि स्त्रीचें तोंड दृष्टीस पडावयाचें नाहीं. या वर्गांतील बायकांचे पायसुद्धां आपल्याकडील लहान मुलांच्या पायांसारखे असतात. यामुळें त्यांनां धड चालतांसुद्धां येत नाहीं.

क्यांटनमधील कित्येक देवळें मीं पाहिलीं. यांतील सर्वांत मोठें जें देऊळ आहे, त्यांत मध्यभागीं बुद्धाची मूर्ति असून त्याच्या प्रभावळींत ज्या बादशहानें पांचशें इतर अनुयायांसह बौद्धधर्माची प्रथम दीक्षा घेतली त्यांच्या मूर्ति बसविल्या आहेत. या सर्व मूर्ति लांकडी आहेत.

नंतर आह्मी हांगकांग बंदरास परत येऊन थेट जपानकडे निघालों व प्रथम नागासाकी येथें सुखरूप येऊन पोहोंचलों. आह्मी कांहीं वेळ शहरांतून फिरून आलों. अहाहा! येथील स्वच्छता काय वर्णावी! मला वाटतें, जपानी लोकांइतकी स्वच्छतेची आवड पृथ्वीवरील दुसऱ्या थोड्याच लोकांनां असेल! रस्ते रुंद, स्वच्छ व फरसबंदी केलेले. पिंजऱ्यासारखीं लहानलहान पण स्वच्छ घरें, व बहुधा प्रत्येक घराला छोटासा बगीचा, याप्रमाणें व्यवस्था असते. जपानी लोकांचा ठेंगुपणा, त्यांच्या पोषाखाची तऱ्हा, चालण्याबोलण्याची ढब वगैरे सर्व कांहीं विचित्र आहे.

नागासाकीहून आह्मी कोबेस गेलों व तेथून खुष्कीच्या मार्गानें योकोहामास पोहोंचलों. यानंतर जपानांतील तीन मोठीं शहरें आह्मीं पाहिलीं. त्यांचीं नावें ओसाका, कियोतो व तोकियो हीं होत. कियोतो ही पूर्वींची राजधानी व तोकियो ही हल्लींची राजधानी आहे. तोकियो शहर कलकत्त्याच्या दुप्पट मोठें असून वस्तीहि दुप्पट आहे. ओसाका शहर धनोत्पादक कारखान्यांसंबंधानें प्रसिद्ध आहे.

जपान देशांत फिरावयाचें असल्यास प्रत्येक परदेशी मनुष्यास प्रथम पास घ्यावा लागतो. हल्लींचा काळ कसा आहे याची जागृति जपानी लोकांस पूर्ण आली आहे. तोफा वगैरे शस्त्रास्त्रांनीं त्यांचें सैन्य आतां जय्यत तयार आहे. त्यांनां लागणाऱ्या बहुतेक सर्व वस्तूंचे कारखाने जपानांत आहेत. एका जपानी कंपनीच्या आगबोटी लवकरच मुंबई बंदराशीं व्यापार सुरू करण्याच्या बेतांत आहेत.

येथेंहि मीं पुष्कळ देवळें पाहिलीं. त्यांपैकीं कित्येकांत जुन्या बंगाली लिपींत लिहिलेले संस्कृत मंत्र आढळले. फारच थोड्या भिक्षूंस संस्कृत समजतें, तथापि हे भिक्षु बरेच बुद्धिमान् दिसले. नव्या सुधारणेची धडपड यांच्यांतहि सुरू आहे हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. जपान देश पाहून मला काय वाटलें तें या लहानशा पत्रांत लिहितां येणार नाहीं. तथापि, आपलेकडील बरेच विद्यार्थी दरवर्षीं जपानांत पाठवितां येतील तर बरें, एवढेंच मी या ठिकाणीं ह्मणतों. हिंदुस्थान ह्मणजे कैवल्यभूमि आहे, अशी अद्यापिहि जपानी लोकांची समजूत आहे. आणि आह्मी खरोखर कसे आहों? हिंदीलोकांनों! तुह्मीं जन्मभर वटवट मात्र करावी, कृतीच्या नांवानें शून्य! या जपानी लोकांनां येऊन पहा, ह्मणजे तुमची तुह्मांलाच लाज वाटेल व मग दिवाभीतांसारखीं दरीखोऱ्यांत तुह्मी आपलीं तोंडें लपवाल. पण तुह्मी इकडे येणार कसे! घराच्या बाहेर पडल्याबरोबर तुमचीं शास्त्रें तुह्मांला प्रथम आडवीं येणार. आज हजारों वर्षें तुह्मीं खुशाल झोंपा काढल्यात व नानाप्रकारच्या रूढींस व शास्त्रांस कवटाळून बसलां. तुमचे डोळे अद्यापिहि उघडूं नयेत काय? आपली सांप्रतची स्थिति

सुधारावी ह्मणून तुह्मी आतां तरी काय करित आहां? हातांत लठ्ठ लठ्ठ पुस्तकें घेऊन समुद्रावर फिरावें, युरोपियन लोकांपासून अर्धवट मिळविलेल्या ज्ञानाची बडबड करावी, आणि २५।३० रुपड्यांची खरडेघांशी मिळविण्याकरितां धडपड करित असावें—फारच झालें तर वकील व्हावें ह्मणजे मोक्षपद हातास आल्यासारखें वाटावें—हीच कायती सांप्रत तुमच्या जन्माची इतिकर्तव्यता होऊन राहिली आहे! विद्यार्जनाचें वय पुरतें उलटलेंसुद्धां नाहीं तोंच बुभुक्षित पोरांचें लेंढार मागें लावून घ्यावें हेंच काय तें तुमचें सौख्य. अरेरे! तुमच्या त्या लांब लांब पदव्या आणखी तुमचे ते युनिव्हर्सिटीचे झगे आणि तीं सर्टिफिकिटें यांसह तुह्मांला जलसमाधि देण्याइतकें पाणी समुद्रांत राहिलें नाहीं काय?

प्रियबांधवांनों! तुह्मी मनुष्य आहां हेंसुद्धां तुह्मी विसरलां काय? जागे व्हा, आणि तुह्मांला जेथें तेथें नडणाऱ्या भटभिक्षुकांनीं निर्माण केलेल्या रूढि झुगारून द्या! त्या रूढींचा आणि त्या निर्माण करणाऱ्या वर्गाचा नाशच करावयास पाहिजे! कारण, ते आतां सुधारण्याची आशा नको! प्रथम या जबरदस्त मगरमिठींतून मुक्त व्हा. आतां आपल्या बिळांतून बाहेर पडून दुसऱ्या लोकांकडे जरा डोळे उघडून बघा! मनुष्यजातीवर तुमचें प्रेम आहे ना? तुमचें तुमच्या जन्मभूमीवर प्रेम आहे असें तुह्मी ह्मणतांना? तर मग चला, पुढें चालूं लागा, मागें फिरून पाहूं नका! आपल्याबरोबर कोणी येतो आहे कीं नाहीं हेंसुद्धां पाहूं नका! सारखी पुढें नजर असूं द्या! आज हिंदुस्थानाला खऱ्या एकच हजार माणसांची जरूर आहे. पण हीं सर्व **माणसेंच** हवीं आहेत, **पशु** नकोत! हजारों वर्षें कुजत पडलेल्या तुमच्या सुधारणेस चलन देण्याकरितांच ईश्वरी सत्तेनें इंग्रजी राज्य झालें आहे. या ईश्वरी कार्यांत मद्रासनें पूर्वीं फारच चांगली मदत केली. आतांहि एक नवें ईश्वरी कार्य करावयाचें आहे. दुष्काळांत हजारों गरीब माणसें मृत्युमुखीं पडत आहेत त्यांच्या तोंडीं भाकरीचा तुकडा कसा पडेल असा प्रश्न सध्या उद्भवला आहे. या कार्यास सांप्रत मद्रासेंतून किती मनुष्यबळ मिळेल? तुमच्या वाड-

वडिलांनीं ज्यांनां आज पशूंच्या पंक्तीस आणून बसविलें आहे त्यांनां फिरून मनुष्यत्व प्राप्त करून देणें हीच सांप्रतची कामगिरी आहे!

विवेकानंद.

ता. क.

एक सूचना करावयाची, ती हीच कीं, आतां प्रत्यक्ष कार्यास लागावयाचें. आतां वर्तमानपत्रांतून लेख लिहून मोलाचें रडणें बस्स झालें! मोठें नांव मिळविण्याची इच्छासुद्धां नको! शांत, निःशब्द आणि अविश्रांत असा उद्योग पाहिजे, एवढें पक्कें लक्ष्यांत ठेवा.

पत्र ४ थें.

ता० ३० आगस्ट १८९३.

प्रियबंधु—

आपलं पत्र काल पावलें. मीं योकोहामाहून लिहिलेलं पत्र आपणास पावलें असेलच. जपान सोडल्यानंतर मी उत्तर पासिफिक समुद्रांतून व्हँकोव्हर येथें आलों. थंडी अतिशय पडत असे आणि माझ्याजवळ लोंकरीचे कपडे नसल्यामुळें तीपासून मला बराच त्रास झाला. तथापि मी व्हँकोव्हर येथें सुरक्षितपणें पोहोंचलों व नंतर कानडा देशांत जाऊन तेथून शिकागोस गेलों. त्या शहरीं मी सुमारें बारा दिवस होतों व तेथं सांप्रत भरलेलें प्रदर्शन पहावयास रोज जात असें. हें प्रदर्शन फारच भव्य व अफाट आहे. हें सगळें पहावयाचें, ह्मणजे निदान दहा दिवसांचें तरी काम आहे. ज्या बाईकडे मी बी—च्या ओळखीनें उतरलों ती व तिचे यजमान हे शिकागोंतील वरच्या वर्गांतील लोकांत मोडतात. त्यांनीं मला फारच ममतेनें वागविलें. नंतर मी शिकागोहून बोस्टनला आलों.

येथील रहाणी फारच खर्चाची आहे. मला रोज सुमारें १५ रुपये खर्च येतो. येथें सर्वच जिन्नस महाग. एका चिरुटास आठ आणे पडतात, यावरून कल्पना करा. अमेरिकन लोक धनवान् आहेत व ते पैसाहि पाण्यासारखा खर्च करितात. अमुक जिन्नस अमुक भावाखालीं विकूं नये, असा कायद्यानेंच निर्बंध ठरविलेला असतो. येथील मजूर लोक रोज दहाबारा रुपये सहज मिळवितात व तेवढा त्यांचा रोजचा खर्चहि असतो. अमेरिकेंत गेल्यावर यंव करूं, त्यंव करूं, अशा आपण गप्पा ठोकित असूं. पण कोणतेंहि कार्य वाटतें तितकें सोपें नसतें, हें येथें माझ्या चांगलेंच अनुभवास आलें. येथून परत हिंदुस्थानांत यावें असें शेंकडों वेळ माझ्या मनांत आलें असेल. पण छे ! असला नामर्दपणाचा विचार मला शिवूंसुद्धां देतां उपयोगी नाहीं !

मला येथें कर्तव्यानें आणिलें आहे, आणि तें कर्तव्य मला बजाविलें पाहिजे. **'देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत्'** हेंच माझें सदोदित चिंतन असलें पाहिजे.

बोस्टनजवळील एका खेड्यांत एका वृद्ध आजीबाईकडे मी हल्लीं रहातों. या आजीबाईची माझी आगगाडींत सहज ओळख झाली. त्यांनीं मला आपल्या येथें रहावयास बोलाविलें व मींहि त्या आमंत्रणाचा स्वीकार केला. तसें करण्यांत सध्या आह्मां दोघांचाहि कार्यभाग साधत आहे. मला काटकसरीनें राहतां येतें हा माझा कार्यभाग, व हिंदुस्थानांतील एक अजब वस्तु ह्मणून माझें प्रदर्शन आपल्या इष्टमित्रांस करतां येतें हा आजीबाईचा कार्यभाग. असे दोघांचेहि हेतु सहज साध्य झाले आहेत. येथें मला सध्या जवळजवळ अर्धपोटींच रहावें लागत आहे. थंडीचा उपद्रव आहेच व भरींतभर ह्मणून आमच्या विचित्र पोषाखास बुजून रस्त्यांतील पोरें पाठीस लागतात. पण मित्रा! कोणत्याहि मोठ्या कार्यास हात घालणारानें अशा गोष्टी विचारांतसुद्धां घेऊं नये.

हा देश केवळ ख्रिस्ती लोकांचा आहे व इतर धर्मांचें वारेंसुद्धां या देशावरून गेलेलें नाहीं. जगांत अलीकडे कांहीं नवे पंथ निर्माण झाले आहेत; पण असल्या पंथांच्या अडथळ्यास मी भीक घालित नाहीं. येथें मला भगवान् येशू ख्रिस्तच पाठीराखा होईल, असा मला पूर्ण भरंवसा वाटतो. ग्यालिलीच्या महात्म्याविरुद्ध मला कांहींहि सांगावयाचें नाहीं, असें मी लोकांस सांगतों व तें त्यांनां पटतें. ते ज्या दृष्टीनें ख्रिस्ताकडे पहातात त्याच दृष्टीनें त्यांनीं हिंदुस्थानांतील महात्म्यांचा विचार करावा, एवढेंच मी त्यांनां सांगतों व तें त्यांनां पसंत पडतें.

आतां हिंवाळा लौकरच सुरू होईल व त्यासाठीं गरम कपडे मला करावे लागतील. खुद्द येथील रहिवाशांपेक्षां माझ्यासारख्या परस्थाला तर या दिवसांत फारच जपलें पाहिजे.

असो. हरकत नाहीं. धैर्य धर, एवढेंच माझें तुला सांगणें आहे. मित्रा! आपल्या हातून हिंदुस्थानांत फार मोठाल्या गोष्टी घडाव्या असा

ईश्वरी संकेत दिसतो. मात्र आत्मविश्वास दृढ असूं दे. ज्यांच्या हृदयाला खरा पीळ पडत आहे ते तुझ्यामाझ्यासारखे अगदीं अकिंचन असले, अथवा लोकांच्या दृष्टीनें अगदीं तुच्छ, कःपदार्थ असले, तरी असलीं कार्यें त्यांच्याच हातून होणार आहेत. आणि इतर.........

परवां शिकागोंत एक मौज झाली. आपलेकडील एक राजेसाहेब प्रदर्शनाकरितां आले होते व येथील कांहीं विशिष्ट व्यक्तींनीं त्यांचें बरेंच स्तोम माजविण्याचा प्रयत्न चालविला होता. नंतर येथें मला एक विक्षिप्त दक्षिणी ब्राह्मण भेटला. तो सगळा दक्षिणी पेहराव करून प्रदर्शनांत नखानें कोरलेलीं चित्रें विकित असे. या गृहस्थानें त्या बिचाऱ्या राजाची अतिशय निंदा तेथील वर्तमानपत्रांच्या बातमीदारांजवळ केली, व त्यांनींहि ती सर्व हकीगत छापून टाकिली. यामुळें बिचाऱ्या राजेसाहेबांवर टीकेचा इतका गहजब उडाला, कीं, त्यामुळें त्यांनां शिकागो लवकरच सोडावें लागलें. असो. तरी पण यावरून अमेरिकेंत नुसत्या सोन्यामोत्यांपेक्षां बुद्धिमत्तेला जास्त मान मिळतो, एवढें सिद्ध होतें.

काल सायंकाळीं बायकांच्या तुरुंगावरील मुख्य बाई मला भेटल्या. येथील तुरुंगांची व्यवस्था इतकी चांगली असते, कीं, त्यांचें वर्णन करून तुला खरेंसुद्धां वाटणार नाहीं, ते प्रत्यक्ष पाहिलेच पाहिजेत. अगदीं निरक्षर कैद्यांस कांहीं तरी धंदा वगैरे शिकवितात व ममतेनें वागवितात. त्यामुळें त्यांच्या चित्तवृत्तींत एवढा फरक पडतो, कीं, ते बहुधा फिरून तुरुंगाचें तोंड पहात नाहींत. आणि आमच्या कोट्यवधि निरक्षर लोकांचीं आज काय स्थिति आहे? अरेरे! या दुबळ्या लोकांबद्दल आह्मांला काय वाटतें याचा नुसता विचारसुद्धां अंगावर शहारे आणितो. आपली स्थिति सुधारतां यावी ह्मणून त्यांनां आज कोणता मार्ग मोकळा आहे बरें? त्यांनीं कितीहि कष्ट केले, हाडांचीं काडें केलीं, तरी गरीबांच्या, नीच स्थितींतल्या लोकांच्या, पापी जनांच्या स्थितींत काडीचा तरी फरक पडण्याची आज आशा आहे काय? त्यांनां ना मित्र ना मदत. जो येतो तो दिवस कालच्यास बरा ह्मणवितो, अशी यांची स्थिति आहे. दुष्ट चालीरीतींनीं दुष्ट झालेल्या समाजानें आज सतत त्यांनां खालीं खालीं दाबण्याचाच प्रयत्न चालविला आहे.

पण या दाबाचें मूळ अद्याप त्यांनां सांपडलें नाहीं. खरें ह्मणशील, तर आपण देखील मनुष्यच आहोंत हें देखील तें विसरून गेले आहेत, आणि याचा परिणाम गुलामगिरी. कांहीं विचारी लोकांच्या लक्ष्यांत ही गोष्ट कांहीं वर्षांपूर्वींच आली होती; पण दुर्दैवाची गोष्ट ही, कीं, या सर्व अनर्थाचें कारण त्यांनीं हिंदुधर्माशीं जोडिलें. त्यांनां असें वाटलें, कीं, हिंदुधर्माचा–जो आज जगांतील सर्व धर्मांत मोठा धर्म आहे–लय होणें हाच एक आमची स्थिति सुधारण्याचा उपाय आहे. पण मित्रा ! तूं पक्कें लक्ष्यांत ठेव, कीं, यांत धर्माचा मुळींच वांक नाहीं. उलट **'सर्वं खल्विदं ब्रह्म'** असेंच हिंदुधर्म सांगत आहे. या अनर्थाचीं कारणें ह्मणशील तर हिंदुधर्मांतील तत्त्वांस व्यावहारिक स्वरूप देण्यांत झालेली हयगय, व खऱ्या सहानुभूतीची व प्रेमाची उणीव, हीं होत. परमेश्वरानें एक वेळ बुद्धरूपानें या भूमींत अवतीर्ण होऊन प्रेमाचें स्वरूप कसें असावें तें तुह्मांला स्वतः आचरून दाखविलें. अत्यंत दरिद्री, अत्यंत विपद्ग्रस्त व अत्यंत पापी अशा लोकांशींसुद्धां तुमची वागणूक कशी असावी हें शिकविलें; परंतु या शिक्षकाकडे तुह्मीं पाठ फिरविलीत. तुह्मी कान असून बहिरे व डोळे असून आंधळे बनलां. ज्यू लोक ज्याप्रमाणें ख्रिस्तगुरूचा उपहास केल्यामुळें शापग्रस्त होत्साते पृथ्वीभर भटकूं लागले, व त्यांनां कोठेंच थारा नाहींसा झाला, तद्वतच अशा अनेक महात्म्यांचा तुह्मीं उपमर्द करून सांप्रतची कर्मदशा आपणांवर ओढून घेतली आहे. वाटेल त्यानें यावें व वाटेल त्या रीतीनें तुह्मांला वागवावें, अशी तुमची अवस्था तुह्मीं आपल्या हातानेंच करून घेतली आहे. अरे पाषाण-हृदयांनों ! तुह्मीं आजवर जो जुलूम केला त्यामुळेंच तुह्मी आतां गुलाम झालां आहां, हें तुह्मांला कळत नाहीं. जुलूम आणि गुलामगिरी हीं एकमेकांचीं सख्खीं भावंडें आहेत व तीं नेहमीं सहचर असतात हें तुह्मांला कळत नाहीं !

मी पाँडिचरीस असतांना एका पंडिताबरोबर परदेशगमनाबद्दल आपण बोलत होतों तो प्रसंग तुला स्मरत असेलच. त्याचे ते पशुतुल्य हावभाव

आणि तें 'कदापि ना!' मी तर जन्मभर विसरणार नाहीं! यांनां वाटतें, कीं, हिंदुस्थान ह्मणजे सगळें जग व आह्मीच कायते या जगांत श्रेष्ठ! पण तीस कोटि किड्यांस एकमेकांबरोबर जुलमाचा धिंगाणा या सुंदर भूमीवर घालतांना पाहून सर्व जग हंसत आहे, हें या अरण्यपंडितांस समजावें कसें? आतां ही सर्व स्थिति बदलण्यास आपण कंबर बांधिली पाहिजे. हिंदुधर्म व त्याचेंच प्रत्यक्ष स्वरूप जो बौद्धधर्म त्याचा आचार आपण जारीनें सुरू केला पाहिजे. आपल्या कार्याच्या पावित्र्याबद्दल अंतःकरणांत पूर्ण विश्वास, ईश्वरी साहाय्याबद्दल पूर्ण विश्वास व दरिद्री आणि विपद्ग्रस्त बांधवांस मुक्त करण्याकरतां पाहिजे तें करण्याची अलोट छाती असणारीं माणसें आह्मांला आज हवीं आहेत. आजपर्यंत हलक्या जातीचे ह्मणून तुडविले गेलेल्या आपल्या बांधवांस त्यांच्या स्थितींतून मुक्त करणें, त्यांनां सर्व प्रकारची मदत करणें, व सर्वत्र समभाव उत्पन्न करणें, हेंच ज्यांचें ब्रीद, अशीं माणसें आज आह्मांला हवीं आहेत.

सर्व समतेचें तत्व ज्यांत इतक्या उत्तम रीतीनें शिकविलें आहे, असा धर्म हिंदुधर्माशिवाय पृथ्वीच्या पाठीवर दुसरा एकहि नाहीं! पण गरीब बिचाऱ्या मागसलेल्या वर्गावर एकसहा जुलूम करणारा धर्महि हिंदुधर्माशिवाय दुसरा नाहीं! बाबारे! यांत धर्माचा दोष नाहीं. तर धर्माच्या नांवाखालीं ज्यांनीं जुलूम करणारीं रूढिरूप शस्त्रास्त्रें निर्माण केलीं त्या भोंदूंचाच हा सगळा प्रताप आहे!

असो. धीर सोडूं नको. **'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'** या भगवंताच्या वाक्याचें स्मरण कर आणि कामासाठीं कंबर बांध. मला तर सारा जन्म हेंच कार्य करण्याची आज्ञा झाली आहे. संसारिक सुख कशाशीं खातात याची तर मला कल्पनासुद्धां नाहीं. माझे आप्त व स्नेहीसंबंधी भुकेनें माझ्या डोळ्यांदेखत तळमळून मेले; ज्यांचें बरें व्हावें ह्मणून मी झटलों त्यांनींच उलट माझी थट्टा केली; माझ्यासंबंधीं गैरविश्वास केला; पण मित्रा! एका अर्थीं हेंहि बरेंच झालें. अत्यंत विपन्नावस्था ही एक मोठी शाळा आहे. हींत न शिकतां तयार झालेला असा एकहि साधु अथवा

तत्ववेत्ता नाहीं. या शिक्षणाचे फायदे ह्मणशील तर अंतःकरणांत खऱ्या सहानुभूतीची प्रेरणा व मनोधैर्य, हे आहेत; पण प्रचंड शक्तींच्या आघातानें या सगळ्या विश्वाचा डोळ्यांदेखत चक्काचूर उडाला तरीहि न डगमगणारी अलोट इच्छाशक्तिहि याच शिक्षणानें उत्पन्न होते, हा सर्वांत मोठा फायदा आहे. ज्यांनीं माझा उपहास केला त्यांच्याबद्दल मला मुळींच द्वेषबुद्धि नाहीं. तीं तर बुद्धिमत्तेंत अद्याप लहान मुलें आहेत! लोकांनीं मोठे व शहाणे ह्मटलें ह्मणून खरें मोठेपण व शहाणपण प्राप्त होत नसतें. यांच्या स्वतःच्या उंचीवरून दिसणाऱ्या क्षितिजापलीकडे यांनां जग ठाऊक नसतें. यांचीं महनीय कर्तव्यें ह्मणजे खावेंप्यावें, यथेच्छ चैन करावी आणि लोकसंख्येंत भर करावी, इतकींच! या आनंदी प्राण्यांस यापलीकडे पाहण्याची जरूर नसते. हजारों वर्षें जुलमाखालीं भरडून निःसत्व, दरिद्री व कलाहीन झालेल्या आमच्याच बांधवांनीं फोडलेल्या टाहोनें यांची झोंपमोड होत नाहीं व यांच्या चैनींत व्यत्यय येत नाहीं. प्रत्यक्ष परमेश्वराचींच अनंत स्वरूपें, पण हजारों वर्षांच्या जुलमी रीतींनीं तीं आज भारवाहक जनावरें कशीं बनलीं आहेत व त्यांनां जीवसुद्धां नकोसा कां झाला आहे, याचा विचारसुद्धां या थोर ह्मणविणाऱ्या व्यक्तींस शिवत नाहीं! तरी पण याचा पूर्ण विचार ज्यांनीं केला आहे, ज्यांनां या बाबतींत रामबाण मात्रा सांपडली आहे व तिचे वळसे उगाळण्याला ज्यांनीं कंबर बांधिली आहे, असेहि महात्मे जन्मास आले आहेत. तर मित्रा! ज्यांनीं या उपायांचें चिंतन करावें त्यांनीं असल्या क्षुद्र कीटकांच्या बडबडीकडे लक्ष्य देऊं नये, हेंच बरें!

आतां तुला आणखी एक विशेष गोष्ट सांगावयाची ती ही, कीं, अशा कामांत ज्यांनां लोक श्रीमंत ह्मणतात अशांवर मुळींच विश्वासूं नको! हे लोक निवळ मृत्पिंड असतात! या कामास योग्य माणसें ह्मटलीं ह्मणजे तुझ्यासारखीं गरीब, हलक्या दर्जाचीं पण विश्वासू माणसें होत. ईश्वरावर पूर्ण भरंवसा असूं दे, आणि जें कांहीं करावयाचें तें सरळ, खुल्या मार्गानें करावयाचें, त्यांत आडपडदे अथवा लपवालपवी नको. गरीबांबद्दल खरा कळवळा असूं दे.

आणि मदतीची जरूर लागलीच तर ती परमेश्वराकडून मिळेलच मिळेल, यांत संदेह बाळगूं नको! हेंच ओझें अंतःकरणांत व हेच विचार डोक्यांत सदैव बाळगून आज बारा वर्षें मी भटकत आहें. आपल्या देशांतील श्रीमंत व मोठे ह्मणविणारांची मीं भेट घेतली आणि आतां शेवटीं मदतीची या परक्या देशांत भीक मागत आहें. शेवटीं तो परमात्मा माझें साहाय्य करील, यांत मुळींच अंतर होणार नाहीं, असा मला भरंवसा आहे. जर कदाचित् भुकेनें व थंडीनें या देहाचा येथेंच पात झाला, तर हिंदुस्थानच्या माझ्या तरुण मित्रांनों! मी तुमच्याकरितां एक वारसदारी मागें ठेवीन. गरीबदुबळे, निराश्रित व जुलमाखालीं चेंगरलेल्या माझ्या बांधवांच्या सुखास तुह्मीं आपलीं जीवितें वहा. हीच माझी तैनात, वारसदार या हक्कानें तुह्मी पुढें चालवा. जा! या क्षणीं त्या पार्थसारथ्याच्या मंदिरास जा आणि माझा वारसा चालविण्याची शपथ वहा. ह्मणजे तो अशरणांचा शरण, ज्यानें गोकुळांत गोपाळांची पाठ राखिली, जो अति शूद्र गूहकाला निर्भरालिंगन देण्यास कचरला नाहीं, ज्यानें बुद्धावतारीं वेश्येच्या आमंत्रणाचा प्रसन्नतापूर्वक स्वीकार करून तिचा उद्धार केला, ज्यानें समाजांतील अत्यंत तुच्छ समजल्या जाणाऱ्या भक्तांसाठीं अवतार घेतले, ज्यानें त्यांच्या संकटांत उडी घालून त्यांचें रक्षण केलें, तो भगवान् श्रीकृष्ण तुमचें साहाय्य करील. तर मग दर दिवशीं खालीं खालीं जाणाऱ्या तुमच्या तीस कोटि बांधवांचा उद्धार करण्याची शपथ तुह्मी वाहणारना ?

हें एका दिवसाचें काम नाहीं, आणि हा मार्ग चोहोंकडे भयंकर कांट्याकुट्यांनीं खच्चून भरलेला आहे. पण भिऊं नका! कार्यास लागा! तुमच्या पाठीवर संरक्षणार्थ तो पार्थसारथी सायुध उभा आहे, हें विसरूं नका. तर मग घ्या त्याचें नांव, आणि हजारों वर्षें सांचलेल्या पापांच्या या पर्वतप्राय राशीस द्या आग लावून, ह्मणजे ती जळून खाक होईल! व्हा पुढें! पहातां काय ? काम मोठें व बिकट आणि आपलें सामर्थ्य अत्यंत अल्प ह्मणून डगमगूं नका! आपण ज्ञानाचे पुत्र आणि भगवंताचीं मुलें आहों! **'यत्र योगेश्वरः कृष्णो तत्र श्रीर्विजयो भूतिः.'**

या प्रयत्नांत हजारों पडतील, पण दुसरे हजार ती जागा घेतील! रोग काय आहे याचें निदान झालें आहे व चिकित्साहि तुह्मांला कळली आहे. आतां दृढ विश्वास धरून चिकित्सेला लागा; पण पुन्हा एकवार सांगतों, कीं, बड्या लोकांच्या मदतीची अपेक्षा करूं नका आणि गारठलेल्या अंतःकरणानें केलेल्या त्या वर्तमानपत्रांतील टीकांनां भीक घालूं नका! ऊन ह्मणूं नका, पाऊस ह्मणूं नका; भूक ह्मणूं नका, तहान ह्मणूं नका; फार काय, हा देहसुद्धां आपला ह्मणूं नका! तो परमेश्वराच्या कार्यास अर्पण करा. मागें पाहूं नका. आपल्या पाठोपाठ कोणी येत आहे कीं नाहीं हा विचारसुद्धां नको! एकसारखे पुढें--पुढें--पुढें चला!

एका सभ्य स्त्रीमंडळापुढें व्याख्यान देण्याकरितां मी उद्यां बोस्टनला जाईन. या मंडळाची पंडिता रमाबाईस मोठी मदत आहे. उद्यां बोस्टनला गेल्याबरोबर प्रथम कपडे बदलले पाहिजेत. गांवांत फिरतांना साधा काळा पोषाख व व्याख्यानाच्या वेळीं भगवी कौपीन धारण करावी, असें मीं ठरविलें आहे.............

येथें व्याख्यानें देणें हेंसुद्धां मोठें अडचणीचें काम आहे. लोक आपल्या कामधंद्यांत इतके निमग्न असतात, कीं, तुमचें ह्मणणें तरी काय आहे, हें ऐकूनसुद्धां घेण्यास त्यांनां फुरसत नसते. असो. पण मी हताश झालों नाहीं. जर तुझ्याकडून आणखी सहा महिने मदत होईल तर मी बराच कार्यभाग येथें उरकीन. माझा मार्ग फारच हळुहळू सुगम होईल. पण कालावधि होणें ह्मणजे या भयंकर खर्चाच्या देशांत आपल्या किती तरी पैशाचा चुराडा होणार. आपलेकडील रुपयाची किंमत कृत्रिम रीतीनें वाढविल्यामुळें सांप्रत येथील बाजारांत मोठा कल्होळ झाला आहे.

मी हा देह पडेपर्यंत कार्य करण्याचा प्रयत्न करित राहीनच; पण तें कार्य समाप्त होण्यापूर्वींच जर हा देह पडला, तर मित्रा! तूं हें काम मित्रकार्य ह्मणून हातीं घे. जर येथें मला यश न आलें तर मी इंग्लंडांत जाईन. तेथेंहि न आलें तर हिंदुस्थानास परत येईन आणि पुढच्या हुकुमाची वाट पहात राहीन.

विवेकानंद.

पत्र ५ वें.

मु० शिकागो, ता० २ नवंबर १८९३.

प्रियबंधु—

अत्यंत दारिद्र्यानें पीडल्यामुळें क्षणैक भान विसरून जें पत्र मीं तुला लिहिलें व त्रास दिला, त्याबद्दल आतां मला फार वाईट वाटत आहे. सध्या ईश्वरानें माझी तरतूद केली आहे. बोस्टनजवळील एका खेड्यांत डॉ. राइट यांची माझी भेट झाली. हे गृहस्थ हारवर्ड युनिव्हर्सिटींत ग्रीक भाषेचे गुरु आहेत. यांनीं मला बरीच सहानुभूति दाखविली व सर्व धर्मांच्या परिषदेंत व्याख्यान देण्याचा आग्रह केला. असें व्याख्यान दिल्यानें माझी अमेरिकन लोकांनां माहिती होईल, असें त्यांचें ह्मणणें आहे. माझी येथें कोणाशींच ओळखदेख नसल्यामुळें या व्याख्यानाच्या बाबतींत सर्व व्यवस्था लावण्याचा डाक्टरसाहेबांनींच पत्कर घेतला आहे, व आतां मी फिरून शिकागोस आलों आहें. या सभेसाठीं आलेले इतर कांहीं पौर्वात्य व पाश्चात्य तत्वज्ञ ज्या गृहस्थाकडे उतरले आहेत त्याच घरीं माझीहि सोय झाली आहे.

परिषदेची उपक्रमसभा भरली त्या दिवशीं सकाळीं आह्मी सर्व प्रतिनिधि आर्ट पॅलेस नांवाच्या एका गृहांत प्रथम एकत्र झालों. सभा भरण्याकरितां एक प्रचंड मंडप तयार केला आहे व त्याच्या आजूबाजूस दुसरेहि लहानलहान मंडप खोल्यांच्या ऐवजीं बांधले आहेत. आपल्या देशांतून ब्राह्मसमाजातर्फें श्रीयुत मुजुमदार, मुंबईचे श्रीयुत नगरकर, जैनधर्मप्रतिनिधि श्रीयुत गांधी व थिऑसफीतर्फें श्रीमती बेझंट व श्रीयुत चक्रवर्ती अशी मंडळी आली आहे. यांपैकीं श्रीयुत मुझुमदार यांची व माझी पूर्वींचीच ओळख होती, व श्रीयुत चक्रवर्ती मला नांवानें ओळखित होते. नंतर आह्मी मिरवणुकीच्या थाटानें सभागृहांत प्रवेश केला व आह्मांला बसण्यासाठीं ज्या उच्च

पीठाची योजना केली होती त्यावर जाऊन बसलों. याच पीठावर आणखी सहासातशें उच्चवर्गीय अमेरिकन लोक बसले होते. हा सर्व समाज पाहून मी तर अगदीं गांगरून गेलों, आणि आतां या समाजांत मी व्याख्यान देणार ! माझें हृदय धाडधाड उडूं लागलें, आणि जीभ तर अगदीं वाळून जाऊन टाळ्याला घट्ट चिकटून बसली! श्रीयुत मुझुमदार यांचें भाषण फारच सुरस झालें; श्रीयुत चक्रवर्ती त्याहून चांगलें बोलले; आणि श्रोतृगणानेंहि त्या दोघांचा चांगला आदर केला. त्या सर्वांनीं फार उत्तम तयारी केली होती. त्यांनीं आपलीं भाषणें आगाऊच पाठ करून ठेविलीं होतीं. मला मूर्खाला ही कल्पना अगोदर सुचली नाहीं. शेवटीं प्रसंग तर आला. डॉ. बॅरोज यांनीं श्रोत्यांस आमची ओळख करून दिली. मीं मनांतल्या मनांत देवी सरस्वतीस वंदन करून भाषणास सुरुवात केली 'अमेरिकेंतील माझ्या प्रियबंधुभगिनींनों !'

दोन मिनिटेंपर्यंत टाळ्यांचा कडकडाट कानठळ्या बसण्यासारखा झाला. मीं आपलें भाषण कसेंबसें संपविलें. मी खालीं बसलों तेव्हां एक मोठें ओझें उतरल्यासारखें मला वाटलें. दुसऱ्या दिवशींचीं वर्तमानपत्रें पाहिलीं, तेव्हां मला कळून आलें, कीं, माझें भाषण सर्वोत्कृष्ट झालें! '**मूकं करोति वाचालम्**' या वचनाचा प्रत्यय मला या दिवशीं आला. या दिवसापासून विख्यात माणसांत माझी गणना होऊं लागली. ज्या दिवशीं माझा वेदांतावरील निबंध मीं वाचला, त्या दिवशीं तर अतोनात गर्दी झाली होती. वर्तमानपत्रांनींहि माझी खूप स्तुति केली होती, त्यामुळें सभ्य स्त्रिया तर त्या दिवशीं अतोनात लोटल्या होत्या. परिषदेंतील सर्व वक्त्यांत उत्तम भाषणें केल्याबद्दल बहुतेक सर्व वर्तमानपत्रें माझी स्तुति करित आहेत.

सध्या मला येथें कशाचीहि वाण नाहीं. अमेरिकन लोक माझ्याशीं फारच ममतेनें वागतात. त्यांचे मी किती उपकार मानूं ? आतां यूरोपला जाण्याकरितां लागणारा सर्व पैसा मला येथेंच मिळेल. येथें एक आचार्य या नांवाचा कोणी मनुष्य आला आहे. तो इकडे आज तीन वर्षें भटकत आहे. तुझी व त्याची ओळख आहे असें तो मला सांगत असतो. त्याच्याबद्दल कांहीं माहिती असल्यास अवश्य कळवावी.

मला आतां वाण नाहीं, हें वर कळविलेंच आहे. येथें मला रोज कोणाना कोणाचें रहावयास बोलावणें असतें. अमेरिकन लोकांइतकी ज्ञानलालसा इतरत्र क्वचितच आढळेल. आणि येथील स्त्रियांबद्दल तर बोलूंच नको! ज्ञानलालसा येथें पुरुषांपेक्षां बायकांतच विशेष आहे. पुरुष सदा कवडीकवडी जोडित असतात आणि स्त्रिया ज्ञानाची जोड करण्यांत गुंतलेल्या दिसतात. कोणालाहि कांहीं नवीन सांगावयाचें असलें तर तो प्रथम इकडे धांव घेतो. पण दुःखाची गोष्ट ही, कीं, अशा लोकांत अर्धेकच्चेच लोक फार असतात. अमेरिकन लोकांतहि कांहीं दोष आहेत; पण अगदीं निर्दोष असा तरी कोण आहे? थोडक्यांत बोलावयाचें ह्मटलें, तर मनुष्य-जातीच्या सुधारणेचें बीज आशियानें पेरलें, यूरोपनें पुरुषजाति सुधारली, व अमेरिकेनें स्त्रिया व खालच्या दर्जाच्या वर्गाच्या सुधारणेंत अघाडी मारिली. स्त्रिया व मजूरलोक यांच्या दृष्टीनें अमेरिका ह्मणजे प्रतिस्वर्ग आहे! आपल्या-कडील स्थितीच्या अगदीं उलट स्थितीची कल्पना करतां आली तर सध्या अमेरिकन स्त्रिया व खालचा वर्ग यांच्या स्थितीची अंशतः कल्पना होईल. अमेरिकन लोक आतां सर्व बाजूंनीं उदारमतवादी होऊं लागले आहेत. आपल्या तिकडे जे इकडील कोत्या मनाचे ख्रिस्ती लोक येतात, त्यांवरून येथील लोकांची कल्पना केली असतां ती साफ चुकीची होईल. परमत-सहिष्णुता हा जो हिंदु लोकांतला मोठा गुण तो अमेरिकन लोकांतहि हळूहळू चांगलाच प्रवेश करूं लागला आहे. प्रचलित हिंदुधर्माचा मोठा दोष ह्मणजे त्यांतील रूढींनीं व नियमांनीं समाज जिकडे तिकडे इतका जखडला गेला आहे, कीं, त्यामुळें समाजाच्या प्रगतीस अडथळा होऊं लागला आहे. हा दोष नाहींसा करण्याकरितां खऱ्या तात्विक हिंदुधर्माची ओळख लोकांस करून दिली पाहिजे. या सुधारणेच्या कामांत सुधारक ह्मणून ज्यांनीं आघाडी मारण्याचा प्रयत्न केला, त्यांनीं प्रत्यक्ष हिंदुधर्मावरच जेव्हां आघात करण्यास सुरुवात केली तेव्हां त्यांचा तो प्रयत्न सपशेल फसला. दगडाची भिंत पाडण्याकरितां मस्तकाचा उपयोग केला तर परिणाम काय होईल, तें दिसतेंच आहे! थेट बुद्धापासून तों राजा राममोहनरायापर्यंत सर्वांनीं हीच

चूक केली आहे. जातिबंधनाची उत्पत्ति तात्विक हिंदुधर्मापासूनच झाली आहे, असा त्यांचा समज झाला. तेव्हां हिंदुधर्माचीच इमारत कोसळून पाडिली तर जातिभेद समूळच उपटल्यासारखा होईल, असा सिद्धांत बांधून त्यांनीं '**मूले कुठारः**' या न्यायाचें अवलंबन केलें. पण हिंदुधर्मतत्वांचा आणि जातिनिर्बंधाचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. समाजघटनेची क्रिया चालू असतां निरनिराळ्या वेळीं सोइस्कर वाटलेल्या चाली प्रचारांत आल्या, व त्याच बळावत जाऊन त्यांनां धार्मिक बाह्य स्वरूप आलें आहे. भिक्षुकवर्गानें कितीहि ओरड केली, तरी खऱ्या तात्विक हिंदुधर्माचा व जातिबंधनाचा संबंध सिद्ध होऊं शकतच नाहीं. जातिभेदानेंहि एक वेळ कार्य केलें आहे; पण तो आतां प्रेतवत् झाला असल्यामुळें त्याला अग्नि देणेंच इष्ट आहे! कारण, आतां तो सडूं लागून त्याला घाण येऊं लागली आहे. तेव्हां त्याचें लवकरच दहन करावें, हें बरें नाहीं काय ? आणि हें करण्याचा उत्तम उपाय ह्मणजे वेदांतधर्माचा प्रसार करून हिंदुस्थानांतील सर्व वर्गांस 'आपण कोण आहों' ही जाणीव उत्पन्न करून देणें, हा होय. प्रत्येक अमेरिकन माणसांत 'मी मनुष्य आहें, मी स्वतंत्र आहें' ही जाणीव आढळून येते. आणि याच्या उलट प्रत्येक हिंदु माणसांत 'मी समाजाचा गुलाम आहें!' ही जाणीव दिसते. कोणतेहि कृत्रिम निर्बंध समाजाला नेहमीं घातकच होत असतात. समाजाची स्वतंत्रता व स्वावलंबन नष्ट झालें, कीं, ताबडतोब तो समाज कुजूं लागतो. तेव्हां या दडपणाचा नायनाट करण्यास प्रथम लागलें पाहिजे. या दृष्टीनें विचार केला, ह्मणजे इंग्रजी राज्य झालें तें बरेंच झालें, असें वाटतें; कारण, या राज्याबरोबरच जीवनकलह अथवा अहमहमिका बास्त प्रखरतेनें भासूं लागली. आतां एखाद्या ब्राह्मणानें जोडेविक्याचें दुकान घातलें, तरी त्याबद्दल कोणास कांहीं वाटेनासें झालें आहे.

बहुतकरून सर्व हिंवाळा मला येथेंच काढावा लागेल. नंतर मी यूरोपांत जाईन. आतां माझी सर्व व्यवस्था ठीक लागेल, त्याबद्दल काळजी करूं नको. तूं माझ्यावर एवढें प्रेम करतोस, त्याबद्दल नुसत्या शब्दांनीं मी कसा उतराई होऊं ? आतां ईश्वरी कृपेचा प्रसाद मला थोडथोडा मिळूं

लागला आहे. तोच मला अखेरपर्यंत साहाय्य करील. आपण अद्यापिहि पुष्कळ मोठ्या गोष्टी करूं, ही खात्री बाळग. पण अशा मार्गांत पडणारांनीं मोठें नांव, मोठी कीर्ति, प्राप्त करून घेण्याची इच्छासुद्धां बाळगूं नये! '**कर्मण्येवाधिकारस्ते**' हें पक्कें लक्ष्यांत बाळगून तूंहि आतां तयारीला लाग. गरीबांबद्दल खरी कळकळ, खालीं पडलेल्यांस हात देऊन उभें करण्याची खरी इच्छा, व पवित्र वर्तन, हींच या तयारीचीं पूर्व अंगें होत. माझ्या तेथील इतर मित्रमंडळीस वारंवार भेटत जा, व त्यांनां नेहमीं हाच उपदेश करित जा.

आपण अकिंचन आहों, दरिद्री आहों, हा विचारसुद्धां मनांत आणूं नको. पैशालाहि असाध्य अशा पुष्कळ गोष्टी केवळ पावित्र्याच्या जोरावर सिद्ध करतां येतात.

सिलोनचे धर्मपाल येथें आले आहेत व त्यांनींहि चांगली छाप बसविली आहे. धर्मपाल हे फारच मनमिळाऊ गृहस्थ आहेत.

पुण्यांतील मिस् सोराबजी नांवाची एक ख्रिस्ती बाई व श्रीयुत गांधी येथें आणखी बरेच दिवस राहून व्याख्यानें देणार आहेत. मला वाटतें, त्यांनां बरेंच यश येईल. व्याख्यानें देणें हा येथें एक धंदाच आहे व द्रव्यदृष्ट्या तो कधीं कधीं चांगला लाभदायकहि होतो. इंगरसोल या नांवाचे येथें एक व्याख्याते आहेत, ते या धंद्यावर एकेका व्याख्यानास पंधराशेंपासून अठराशें रुपये मिळवितात.

विवेकानंद.

पत्र ६ वें.

मु० शिकागो, ता० २४ जानेवारी १८९४.

प्रियबंधु—

आपलीं सर्व पत्रें पावलीं. माझ्यासंबंधीं आपणास इतकी बातमी इतक्या लवकर समजली, हें पाहून जरा नवल वाटलें. आपण ज्या वर्तमानपत्राच्या टीकेसंबंधीं लिहिलें आहे, त्या पत्राचें मत ह्मणजे अमेरिकन लोकांचें मत नव्हे ! त्या पत्राची येथें वजनदार पत्रांत गणना होत नाहीं. तें पत्र ह्मणजे ख्रिस्ती धर्मासंबंधांत अत्यंत कोत्या विचारांचें प्रदर्शनच आहे, असें येथील सामान्य लोकमत आहे. पुष्कळ अमेरिकन मिशनरीसुद्धां मला चाहतात, हें त्या पत्राला सहन न झाल्यामुळें त्यानें माझ्यावर हत्यार धरिलें आहे. असल्या लेखानें मला येथें कांहीं नुकसान पोंहोंचेल, असें मनांतसुद्धां आणूं नको. मात्र हिंदुस्थानांतील कांहीं ख्रिस्ती मिशनऱ्यांस माझी निंदा करण्यास तें एक साधन होईल. तसें झालेंच, तर ख्रिस्तानें ज्यू लोकांनां सांगितलेलें वचनच माझा निरोप ह्मणून त्यांनां कळीव. ख्रिस्त एक वेळ ज्यू लोकांनां उद्देशून ह्मणाला 'ध्यानांत ठेवा, तुमचे दिवस भरत आले आहेत!' त्यांची जुनी इमारत आतां मोडकळीस आली आहे आणि त्यांनीं केवढाहि अट्टहास केला तरी ती पडल्यावांचून रहात नाहीं. आमच्या वेदांतधर्माची छाप अमेरिकन लोकांवर बसली, ह्मणजे या भटांच्या हिंदुस्थानांतील चैनी बंद होतील, हें पाहून वाईट वाटतें. असो. पण ज्याअर्थीं आतां पाण्यांत पाय घातला आहे त्याअर्थीं आतां सपाव्यानें पोहून परतीर गांठलाच पाहिजे.

मी येथें वाचलेला निबंध आपणास पाहण्याकरितां पाठविला आहे. येथें जीं भाषणें मी करतों, त्यांची पूर्वतयारी मी कधींच करित नाहीं. समयस्फूर्तीनें जें सुचेल तें बोलत जातों.·········मला आतां आपल्याकडून

कांहीं मदतीची गरज लागणार नाहींसें वाटतें. सध्या आपणापाशीं कांहीं पैसा सांठला असल्यास आपण माझें भाषण छापून काढा व त्याचीं देशी भाषेंत भाषांतरें करवा व त्याचा होईल तेवढा झपाट्यानें प्रसार होऊं द्या. म्हणजे यायोगें जनतेकडे पुढेंमागें धांव घेण्यास मला त्याचा उपयोग होईल. तथापि अशीं कामें करित असतां आपला कॉलेज काढण्याचा विचार मागें पडूं देऊं नको! झटून उद्योग सुरू असूं दे.

येथील महिलावर्गानें जें औदार्य मला दाखविलें आहे, तें ऋण नुसत्या शब्दांनीं कधींहि फिटणारें नाहीं. ईश्वर त्यांचें कल्याण करो! सर्व लोकोपकारी कामांत येथें बहुधा स्त्रियाच पुढाकार घेतात. बुद्धिमत्तेची वाढहि महिलावर्गांतच विशेष झाली आहे. यासंबंधीं पुरुषवर्गांत सुधारणेस बराच अवकाश आहे.

के—चें पत्र मिळालें. जातिभेद आहे असाच राहील कीं नष्ट होईल, या प्रश्नाशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. उच्च धर्मतत्वांचा प्रसार अगदीं शेतकऱ्याच्या झोंपडीपर्यंत करून देऊन त्यांची स्वतःची ओळख त्यांनां पटावीसें करणें, एवढेंच माझें कर्तव्य आहे. मग जातिभेदाचें कांहींहि होवो! त्याबद्दल लोकच आपोआप विचार करतील. जातिभेद, स्त्रीस्वातंत्र्य वगैरे माझे विषय नव्हत. मतस्वातंत्र्य व कृतिस्वातंत्र्य मिळवून देणें, हेंच सध्या आपलें कर्तव्य आहे. कारण, समाजाची वाढ यांवरच अवलंबून असते. जेथें हें स्वातंत्र्य नष्ट होत चाललें असेल त्या समाजाला अधोगति प्राप्त होण्यास आरंभ झाला आहे, असें समजावें. उच्च तत्वांचें समाजाकडून ग्रहण करविणें हीच कायती माझी कामगिरी आहे. जीवितयात्रेंतील बिकट कूट प्रश्नांस आमच्या पूर्वजांनीं काय उत्तरें दिलीं आहेत व सध्या हे प्रश्न इतर राष्ट्रें कसे सोडवित आहेत, हेंच माझ्या लोकांनां मला सांगावयाचें आहे. आपण मिश्रण एकत्र करून ठेवावें, म्हणजे आपलें काम झालें. पुढील सर्व क्रिया स्वाभाविकपणेंच होऊं लागतात. त्यासाठीं निराळी खटपट नको. उद्योग मात्र सतत सुरू ठेव आणि तसेंच ईश्वरावरील विश्वास ढळूं देऊं नको. मी केव्हां तरी तिकडे येईनच; पण मी तेथें नाहीं म्हणून अडून बसूं नको. 'धर्महानि न करतां खालच्या वर्गाच्या उन्नतीसाठीं झटणें' हीच कामाची कायमची दिशा समज.

चंद्रमौळी घरांतून आढळणारे, शेतांत व इतर हलकीं कामें करताना आढळणारे लोक हेच आपलें खरें राष्ट्र होय, हें पक्कें लक्ष्यांत ठेव. राष्ट्रोन्नतीच्या गप्पा ठोकणारांनीं आजवर या वर्गाची अवहेलनाच केली आहे. सुधारकांनां तर पुनर्विवाहानेंच घेरलें आहे. पुष्कळशा विधवांस पुन्हा नवरे मिळाले ह्मणजे राष्ट्रोद्धाराचें काम संपलें, असेंच त्यांनां अझून वाटत आहे. या माझ्या लिहिण्यावरून मी या सुधारणांच्या विरुद्ध आहें, असें नव्हे. उलट, त्यांनां माझी पूर्ण सहानुभूति आहे. पण राष्ट्राचें जीवित असल्या क्षुद्र गोष्टींवर अवलंबून नसतें, एवढेंच माझें ह्मणणें आहे. खालच्या वर्गाची स्थिति हीच सर्व राष्ट्राच्या खऱ्या स्थितीची द्योतक आहे. त्या वर्गाचा सांप्रतच्या स्थितींतून उद्धार होईल असे यत्न हवे आहेत. पण असें करतांना ज्या धार्मिक मनोवृत्ति त्यांच्यांत आज पिढ्यान्‌पिढ्या वास करित आल्या आहेत, त्यांचा उच्छेद न होईल अशाबद्दल अतिशय काळजी बाळगिली पाहिजे. यूरोपांतील लोकांप्रमाणें कृतीचें पूर्ण स्वातंत्र्य, कोणत्याहि धंद्यांत बुद्धीचा पूर्ण विकास होण्यास अवकाश, हीं ज्याचीं बाह्यांगें व ज्या हिंदुधर्माच्या अनुरोधानें तात्विक विचार पूर्णपणें मुरून गेले आहेत त्याच हिंदुधर्माची अंतरंगांत वाढ, असा समाज ज्या दिवशीं हिंदुस्थानांत दिसूं लागेल तो सुदिन! हें सर्व खास होणार आणि हें आपण करणार! ह्या यशाचा वांटा आपण घेणार, किंबहुना आपला जन्मच याकरितां आहे, हें सदैव ध्यानांत बाळग. असा आत्मविश्वास दृढ झाला, ह्मणजे तुझ्या हातून वाटेल तें महत्कृत्य सहज लीलेनें पार पडेल. गरीबांचा, पतितांचा उद्धार हीच आपल्या निशाणाची खूण.

विवेकानंद.

ताजाकलमः—

एक मुख्य कॉलेज (मठ) काढून तेथून अशा कामाकरितां लोक तयार करावयाचे. या कल्पनेचा होईल तितका प्रसार करून मदत मिळविली पाहिजे.

विवेकानंद.

पत्र ७ वें.

शिकागो, ता० २ मार्च १८९४.

प्रियबंधु—

आपलें पत्र पावलें. उत्तम प्रतीची श्रद्धा असली ह्मणजे मुक्तीचे मार्ग खुले होतात, हें आपलें ह्मणणें सर्वथैव सत्य आहे व मलाहि तें अर्थातच कबूल आहे; पण शुद्ध श्रद्धा आणि अंधविश्वास हीं दोन्ही निरनिराळीं आहेत, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. पुष्कळ वेळां या दोहोंतील फरक लक्ष्यांत न आल्यामुळें श्रद्धा ह्मणतां ह्मणतां तिचाच अंधविश्वास होऊन मनोविकासाचा मार्ग खुंटतो !

तसेंच ज्ञान हें सर्वांत श्रेष्ठ आहे हेंहि आपलें ह्मणणें कोण नाकबूल करील ? पण त्यांतहि एक भीतीची जागा आहे. नुसत्या बुद्धीचा विकास होऊन उत्तम प्रतीचा वादविवाद करतां येईल. चार मंडळीस समर्पक भाषणानें थक्क करतां येईल. पण बुद्धीचीच नुसती वाढ झाली ह्मणजे असा मनुष्य पुष्कळ वेळां हृदयशून्य होत जातो. दया, प्रेम, शांति वगैरे जे हृदयाचे सात्विक गुण आहेत त्यांचा झरा बुद्धीच्या प्रखर तेजानें मुळाशींच कोरडा होण्याची फार भीति असते. त्यामुळें पुष्कळ वेळां अशा कोरड्या ज्ञानापासून उपकारापेक्षां अपकारच अधिक होतो. षट्शास्त्रसंपन्न कोरडे वेदांती वादांत कसें चातुर्य दाखवितात व पुष्कळ वेळां खाटकासहि लाजविणारी कृति कशी करितात, हें ध्यानांत आण. त्याचप्रमाणें प्रेमाचीहि गोष्ट आहे. शुद्ध प्रेम आणि विषयसंलग्न प्रेम यांतील सूक्ष्म भेद लक्ष्यांत येत नाहीं. विषयसंलग्न प्रेमाचा विषय नष्ट झाला अथवा सहवासानें त्याबद्दल अनादर उत्पन्न झाला, कीं, हें प्रेम आटपलें! वास्तविक, या सगळ्या शुद्ध गुणांचें योग्य संमेलन आपल्या वर्तणुकींत उतरलें पाहिजे. भगवान् श्रीरामकृष्ण यांच्यांत असें संमेलन मूर्तिमंत वास करित होतें. असे

पूर्णत्वास पोहोंचलेले पुरुष क्वचितच पाहण्यांत येतात. तेव्हां नमुन्यादाखल त्यांचीच मूर्ति पुढें ठेवून कार्यास लागूं या. आपल्यापैकीं एकाच्याचजवळ हे सर्व गुण एकवटले नाहींत, हें उघड आहे; पण आपण एकेकानें एकेका गुणाची वाढ केली, तर सर्व मिळून वरील गुणांचें पूर्ण ऐक्य झालेला एक छोटासा संघ तयार होईल, व तोहि बराच कार्यकारी होईल. इतर कांहीं करण्यापेक्षां एवढें तरी आपण करूं या.

कोणत्याहि धर्माचें लोकांनीं त्वरेनें ग्रहण करण्यास प्रथम तो धर्म शिकविणाराच्या अंगांत उत्तम उत्साह असावा लागतो. तसेंच त्यानें निराळा पंथ अथवा मार्ग काढण्याच्या भरीस पडूं नये. आणि वास्तविक तसें करण्याचें कारणहि नाहीं. सर्वसामान्य तत्वें सर्व धर्मांचीं एकच आहेत. तेव्हां आपण एखाद्या विशिष्ट पंथाचा अंगिकार करण्याचें कारणच उरत नाहीं. यायोगें सर्वव्यापी तत्वांचा उपदेश करणें जड जात नाहीं.

ईश्वर जरी सर्वव्यापी आहे, तरी त्याचें प्रत्यक्ष अथवा अपरोक्ष स्वरूप मनुष्याच्या कृतीवरूनच दिसणारें आहे. असें पूर्ण व्यक्त स्वरूप फक्त एक श्रीरामकृष्ण यांचेंच होतें. याच मध्यबिंदूभोंवतीं आपण आपलें सर्व सैन्य एकवटलें पाहिजे. मग कोणाला ते प्रतिईश्वर वाटतील; कोणाला फक्त त्यांची विद्वत्ताच प्रत्ययास आली असेल ह्मणून ते त्यांनां नुसते विद्वानच समजतील; पण त्यामुळें आपणांत मतभेद होण्याचें कारण नाहीं. आमचें जातिभेदाबद्दलच अथवा एखाद्या विशिष्ट चालीच्या इष्टानिष्टतेबद्दलच कांहीं ह्मणणें नाहीं. सर्व मनुष्यांनां समान हक्क व पूर्ण स्वातंत्र्य आहे, एवढेंच आमचें ह्मणणें आहे.

कोणी कोणत्याहि पंथाचा अगर धर्माचा असो, आह्मांला त्याला बाहेर टाकण्याची इच्छा नाहीं. अगदीं शुद्ध निरीश्वरवादी असला, तरी सुद्धां आह्मांला चालेल; पण पूर्णपणें उदार आणि उत्साही असा तो बनत गेला पाहिजे, एवढाच आमचा कटाक्ष आहे. तसेंच खाण्यापिण्यासंबंधीं अथवा इतर कोणत्याहि बाबतींत त्यानें कांहीं विशिष्ट नियम पाळिलेच पाहिजेत, असा निर्बंध घालण्याचा आह्मांला अधिकार नाहीं, असें मी समजतों.

मात्र त्याच्या चालीरीती अथवा संवयींपासून दुसऱ्याला उपसर्ग लागणार नाहीं, एवढी त्यानें काळजी घ्यावी.

पाप आणि पुण्य यांच्या माझ्या व्याख्या अशा आहेत. मनुष्याच्या पूर्णत्वाच्या आड येणारें जें जें कर्म तें पाप, व ज्या ज्या कर्मांच्या योगानें मनुष्य पूर्णत्वास येण्यास, त्याच्या विश्वव्यापकतेचा साक्षात्कार त्याला पटण्यास मदत होते तें तें कर्म पुण्यकर्म. केवळ याच दृष्टीनें आह्मांला कोणाच्याहि कृतीचा विचार करावयाचा असल्यामुळें ज्याला ज्या मार्गानें वरील प्रकारचा पुण्यसंचय करतां येईल त्याला त्या मार्गाचा अवलंब करण्यास मोकळें सोडणें हेंच सर्वथा इष्ट आहे. मूलतत्वाचें उल्लंघन होऊं नये, एवढेंच आमचें पाहणें आहे. उदाहरणार्थः—एखाद्याला कंदफलाशनानें अथवा नुसत्या दुग्धपानानेंच त्याच्या मार्गांत त्याला मदत होतेसें वाटत असेल तर त्याला त्याच जिनसांचा पूर्ण उपयोग करण्यास जशी हरकत नाहीं, तसेंच कोणास मांसाशन इष्ट असेल तर त्याच्या आड येण्यास आह्मांला काय अधिकार आहे ? एकाचें जें अन्न तेंच दुसऱ्याचें विष होऊं शकतें, हें आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. एखाद्यास ब्रह्मचर्य इष्ट असेल ह्मणून सरसकट सर्वांसच ब्रह्मचारी आपण बनवूं लागलों, तर केवढा अनर्थ होईल? यासाठीं, आपण एकाच गुरुचे चेले झालों व एकच तत्वें आपणा सर्वांनां पटलीं, ह्मणून इतर वर्तनाचे मार्गहि एकच असले पाहिजेत, असें ह्मणण्याचा कोणासच अधिकार नाहीं.

प्रत्येक मनुष्यप्राणी ह्मणजे ईश्वराचीच प्रतिमा आहे, हें आमचें मूलतत्व होय. त्यांत जो कमीअधिकपणा दिसून येतो त्याचें कारण बुद्धीची कमीअधिक वाढ हेंच होय. सूर्य जरी एकच असला, तरी निरनिराळ्या उपाधींनीं तो जसा निरनिराळा भासतो,तद्वतच मनुष्याच्या आंतील ज्ञानज्योतीवरील पटलांचें ज्या ज्या मानानें उच्चाटण झालें असेल त्या त्या मानानें ती त्याच्या कृतींत प्रतिबिंबित होत असते; पण यामुळें मूलस्वरूपाच्या अभेदतेंत प्रत्यवाय येऊं शकत नाहीं. तुह्मी कोणतीहि सुधारणा घ्या, ती याच मूलभूत तत्वास धरून चालेल तरच ती यशस्वी होईल. मग

ती जड सुधारणा असो, अथवा बुद्धिवर्धक असो, अगर बुद्धिगम्य धर्मविषयक असो. तींत हें एकच तत्व निरनिराळ्या मार्गांनीं प्रतिबिंबित झालें असलें पाहिजे. सर्व वेदांचें सार या वरील एक तत्वांतच आहे.

वरील दृष्टीनें विचार केला ह्मणजे प्रत्येक मनुष्याचें इतर मनुष्यांशीं काय कर्तव्य आहे, हें उघड होतें. कोणीहि मनुष्य कमी बुद्धिमान् अथवा द्रव्यदृष्ट्या कमी योग्यतेचा असला, तर तेवढ्याचकरितां त्याच्या उच्चस्थितींतील बांधवांनीं त्याचा द्वेष करणें, अथवा त्याला हेटाळणें, हें महापातक होय. उच्चस्थितींतील मनुष्य जसा ईश्वराची प्रतिमा आहे, तितक्याच प्रमाणानें त्याचा अज्ञ बांधवहि ईश्वराचीच प्रतिमा आहे. तेव्हां हें सदोदित लक्ष्यांत बाळगून वागणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य होय. हें तत्व फक्त संन्याशालाच लागू आहे, असें नाहीं.

वरील विवेचनावरून जातिभेदादि रूढींचें धर्मदृष्ट्या केव्हांहि मंडन होणें शक्य नाहीं. किंबहुना हिंदुधर्माचा ह्मणजे वेददर्शनादिकांचा सगळा रोंख उलट असले सर्व कृत्रिम भेद नष्ट करून अभेद स्थापन करण्याकडेच आहे. तेव्हां खोट्या धर्माच्या नांवाखालीं असले भेद बळकट करून त्यांतून हिंदुस्थानचा उद्धार करूं पाहणें ह्मणजे चिखलानें चिखल धुऊन काढण्यासारखेंच हास्यास्पद आहे. अथवा एकसारखीं पापें आचरून पुण्यसंचय करूं ह्मणण्यासारखेंच तें आहे. तेव्हां धर्माच्या नांवानें घेतलेलीं हीं खोटीं पांघरुणें प्रथम फेंकून द्या, व खऱ्या धर्मानें वागूं लागा, ह्मणजे सर्व कांहीं आपोआप नीट होईल.

मनुष्यमात्रांत सदैव असणाऱ्या ज्ञानज्योतीभोंवतालचें आवरण निघून जाऊन तिचा प्रकाश फांकणें, याचें नांव शिक्षण.

तसेंच, मनुष्यमात्रांत सदैव वास करणाऱ्या ईश्वरत्वाभोंवतालचें आवरण निघून जाऊन त्याचें ईश्वरत्व त्याच्या कृतींत प्रतिबिंबित होणें, याचें नांव धर्म.

या दोन व्याख्या नेहमीं ध्यानांत बाळगून तुह्मीं लोकशिक्षणाचें काम हातीं घेतलें, ह्मणजे तुमचा मार्ग तुह्मांला उघड दिसूं लागेल. वरील तत्वांचा

जेणेंकरून लोकांत प्रसार होईल अशीं कामें करित राहणें, एवढेंच तुमचें मग कर्तव्य उरलें. बाकी जास्त ढवळाढवळ करण्याचें कारण नाहीं.

तेव्हां भटांभिक्षुकांस धर्माच्या नांवाखालीं असला सांवळा गोंधळ घालण्यास काय अधिकार पोंहोंचतो,याचा तूंच विचार कर. क्षत्रिय मांस खातात ह्मणून त्यांच्या नांवानें भिक्षुक खडे फोडतात; पण त्यांनीं पक्कें लक्ष्यांत ठेवावें, कीं, हिंदुधर्मांत जीं जीं ह्मणून उदात्त व सर्वमान्य तत्वें आहेत तीं तीं क्षत्रियांनींच पुढें आणिलीं आहेत व त्यांचें त्यांनींच प्रत्यक्ष आचरण करून दाखविलें आहे. उपनिषदांचे कर्ते कोण होते? प्रभु श्रीरामचंद्र जातीनें कोण होते ? भगवान् श्रीकृष्ण कोणच्या जातीचे होते? बुद्धाचा जन्म कोणत्या जातींत झाला होता ? जैनांचे तीर्थंकर कोणत्या जातीचे होते? जेव्हां जेव्हां क्षत्रिय स्वतः ज्ञानवान् झाले, तेव्हां तेव्हां त्यांनीं तो मार्ग अगदीं हीन शूद्रांपर्यंत सर्वांना सारखा खुला करून दिला. उलट पक्षीं, ब्राह्मण ज्ञानवान् झाले तेव्हां त्यांनीं हे सर्व मार्ग बंद करण्याचें मात्र श्रेय घेतलें. अरे, ईश्वर इतका का मूर्ख आहे असें तुह्मांला वाटतें, कीं, मांसाच्या एका तुकड्यानें त्याच्या करुणेचा झरा सर्व एकदम आटून जाईल! आणि तसें होत असेलच तर असला क्षुद्र ईश्वरच आह्मांला नको!

माझ्या स्वतःबद्दल ह्मणशील तर माझ्या मदतीची तुह्मीं अपेक्षा करूं नये, हेंच बरें. यासंबंधाची कामगिरी तुमची तुह्मींच करूं लागावें, हें बरें. तुह्मांपैकीं कांहींनीं या उद्धाराच्या कामासाठीं जवळ जवळ वेडें झालें पाहिजे. इतका याच गोष्टीचा सतत निदिध्यास लागलेले तुह्मांला कोणीच आढळत नाहींत काय? माझ्या मतें भगवान् रामकृष्णाचें सर्व चरित्र लिहून तयार करावें. त्यांत त्यांनीं केलेले सर्व चमत्कार गाळून टाकावे. फक्त जीं तत्वें ते तोंडानें उच्चारीत त्यांचा परिपाक त्यांच्या कृतींत कसा उतरत असे, याचेंच मुख्यतः विवेचन करावें. ह्मणजे फक्त तात्विक दृष्ट्याच या महात्म्याच्या चारित्र्याचा ठसा वाचकांवर उमटावा, एवढाच हें चरित्र लिहिण्यांत प्रधान हेतु असावा. हें चरित्र फक्त त्यांचेंच असावें; त्यांत माझा अथवा इतर कोणा शिष्याचा संबंध आणण्याचें कारण नाहीं.

जीं तत्वरत्नें त्यांनीं माझ्या स्वाधीन केलीं तीं तुझ्याचसारख्या लोकांच्या स्वाधीन करावीं एवढीच कामगिरी त्यांनीं मला सांगितली होती. जे केवळ जडवादी अतएव मूढ व विवेकपराङ्मुख त्यांच्या स्वाधीन असलीं रत्नें करणें ह्मणजे कोंबड्यास माणीक अशीच स्थिति व्हावयाची; किंबहुना, याहूनहि तें वाईट झालें असतें. असल्या तत्वांनीं ते जास्त उच्छृंखल मात्र झाले असते. माझें कर्तव्य संपलें व मी मृत झालों असेंच मानून तुह्मीं कार्यास लागावें. तुमच्या सारख्या तरुणांकडेच हा वारसा आतां आला आहे.

शेवटीं एवढेंच लक्ष्यांत ठेवा, कीं, ही चळवळ व्यक्तिविषयक असूं नये. कोणत्याहि व्यक्तीविरुद्ध अगर विशिष्ट चालीबद्दल बोलूं नयें. जातिभेदा-विरुद्धहि बोलूं नये, अगर त्याच्या तर्फेनेंहि बोलूं नये.

तुझ्यासारख्या शूर, कार्यदक्ष व प्रेमळ आत्म्यांस ईश्वरानें सदैव सुखी ठेवावें, अशी त्याची प्रार्थना करणारा,

विवेकानंद.

पत्र ८ वें.

शिकागो, ता० २८ मे, १८९४.

प्रियबंधु—

न्युयॉर्क व बोस्टन यांच्या दरम्यान माझ्या सतत खेपा सध्या सुरू असल्यामुळें मला गेल्या बऱ्याच दिवसांत पत्र लिहिण्यास सवड झाली नाहीं. मी आतां तिकडे केव्हां परत येईन तें सांगतां येत नाहीं. पण तुह्मी माझ्यावरच कां अवलंबून राहतां ? तुह्मी आपलें कर्तव्य करण्यास सुरुवात करा. माझ्यापेक्षां ईश्वरावर मदतीकरितां भार टाकून एकदम कामास लागणें बरें नव्हे काय ? मी काय तुमच्या जन्मला पुरलों आहें ? मी जन्मासच आलों नाहीं असें तुह्मी समजा आणि सतत उद्योग करा. तुह्मीं ईश्वराशिवाय दुसऱ्याकडून अथवा कशाच्याहि मदतीची अपेक्षा करूं नये !

येथें माझीं एकंदर बरींच भाषणें झालीं. जरी माझी सर्व व्यवस्था ठीक आहे व येथील मोठ्या लोकांकडून मला चांगली मदत आहे, तरी खर्चाकडे पाहून माझा जीव दडपून जातो.

येत्या उन्हाळ्यांतच मी अमेरिका सोडीन कीं नाहीं तें सांगतां येत नाहीं. बहुधा नाहीं असेंच वाटतें. आतां आत्मविश्वास ठेवून कार्यास लागा. तुमच्याच हातून या सर्व गोष्टी पार पडाव्या, या यशाचा वांटेकरी दुसरा कोणीं होऊं नये, असाच ईश्वरी संकेत दिसतो. तर मग त्या संकेताविरुद्ध जाण्याचें मनांतसुद्धां आणूं नका. तुमचा पाठीराखा आतां तोच आहे.

आपण ह्मणतां, कीं, मी आल्यानें लोक जास्त उत्साहानें मदत करतील. तर यासंबंधीं आपणास एवढेंच सांगावयाचें, कीं, आपल्या लोकांच्या उत्साहाबद्दल माझी खात्री पूर्वीच होऊन चुकली आहे. त्याबद्दलची माझी हौस फिटून गेली आहे ! पण लोकांकडून शाबासकी मिळविण्याची हांव तरी कशाला हवी ? आपलीं कामें लोकांच्या लक्ष्यांत न आलीं ह्मणून

ईश्वराकडे तीं नोंदलीं जात नाहींत काय ? ह्मणून लोकांच्या शाबासकीची अपेक्षा न करितां कामास लागा. इतके दिवस नुसतें विवेचनच चालू आहे, कार्यास अद्याप आरंभ सुद्धां नाहीं, हें ध्यानांत ठेव.

या कार्याचा आरंभ प्रथम तरुण व सुशिक्षित लोकांत होऊंद्या. अशा स्वार्थत्यागी तरुणांचा एक संघ बनविला पाहिजे. स्वार्थत्यागावांचून जगांत कशालाहि सिद्धि नाहीं, हें विसरू नका. यांत आत्मप्रौढीची क्षुद्र वासना, मोठें नांव, वगैरे सर्व प्रकारच्या हांवेस प्रथम तिलांजुली दिला पाहिजे. सतत कार्यमग्न व्हा. लोक काय ह्मणतात, कोणी शिव्या देतात कीं ओंव्या गातात हें पाहण्याचें आपलें काम नव्हे ! अरे, असला एखादा लहानसा संघ जरी तयार झाला, तरी तो प्रचंड कामें हां हां ह्मणतां उठवील ! गवताच्या दोरीनें एखादा मस्त हत्तीसुद्धां बांधला जातो. अशा संघांत ईश्वरी तेजाचा वास असतो. चला तर, जागे व्हा ! रात्र संपून अरुणाची आरक्त प्रभा फांकूं लागली आहे. आतां भरतीस सुरुवात होईल. तिच्या प्रचंड लाटा वाहूं लागल्या ह्मणजे त्यांच्या आड उभें राहण्याची ताकद कोणासहि नाहीं. अढळ आत्मविश्वास हाच तुमचा नावाडी. याच्या साहाय्याशिवाय पाऊलहि टाकूं नका. भीतीचा तर लेशसुद्धां नको. भीतियुक्त अंतःकरण ही अतिशय भयंकर अशी पापगर्ताच आहे. ह्मणून भीतीस हृदयांतून प्रथम हद्दपार करा !

माझा तुह्मां सर्वांनां पूर्ण आशीर्वाद आहे. जे जे महात्मे स्वार्थत्याग करण्यास व या देशोद्धाराच्या कार्यास मदत करण्यास तयार असतील त्या सर्वांचा मी आजन्म ऋणी राहीन, असें त्यांनां कळव व आतां 'वाट पहात बसण्यास अवधि नाहीं, तर आतां कार्यास लागा व थांबूं नका,' एवढा माझा निरोप त्यांनां सांग.

आपण कांहीं मोठें काम करित आहों ही भावना बळावत गेली ह्मणजे गर्व उत्पन्न होऊं लागण्याची फार भीति असते. ह्मणून तो उत्पन्न न होईल अशाविषयीं फार जपा. कारण, या दुष्ट शत्रूनें जर का एक वेळ घेरलें, तर आपलींच मतें दुसऱ्यावर नेहमीं लादण्याची संवय लागते. यामुळें पुष्कळ

वेळां सन्मान्य व्यक्तींचा उपमर्द होतो व शेवटीं कार्याची माती होते ! ह्मणून कोणत्याहि व्यक्तीविरुद्ध केव्हांहि बोलावयाचें नाहीं, हा नियम लक्ष्यांत ठेवा. मला सध्या येथें जय येत आहे ह्मणून, अथवा तुमच्याहि कार्यास तेथें थोडेंबहुत यश येऊं लागलें ह्मणजे फुगून जाऊं नका. कारण, एवढ्याच आनंदांत जर तुह्मी गर्क झालां, तर पुढील कार्यास विरजण पडेल ! आपण ज्यावर चढून जाण्याची इच्छा करित आहों, त्या पर्वताचें शिखर किती उंच आहे तें नेहमीं पहात चला. याचा शेवट काय होणार याचा निकाल अगोदरच लागला आहे. सध्या सर्वतोपरि दीन झालेल्या भरतभूमींत सुखाचा दिवस लवकरच उगवणार, हें पूर्वींच ठरलें गेलें आहे. तुह्मीं कार्यास आरंभ करण्याचाच काय तो अवकाश आहे. परमेश्वरी सत्तेचा पूर निराळ्या दिशेनें वाहूं लागलेला दिसत आहे, सर्व प्रकारचीं अरिष्टें त्यांत बुडून जात आहेत व नाश पावत आहेत. **'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥** हें आश्वासन पूर्ण होत आहे असा देखावा माझ्या मनःचक्षूं पुढें आजच गोचर होऊं लागला आहे. त्या परमात्मशक्तीचा जयजयकार असो !

आपल्याकडून आतां मला पैशाची मदत नको. आतां आपण कांहीं म्याजिक ल्यांटर्न्स विकत घ्या. तसेंच, कांहीं नकाशे व पृथ्वीगोलहि घ्या. तसेंच, अशा प्रकारचीं कांहीं इतर उपकरणेंहि घ्या. नंतर अगदीं गरीब अशा लोकांचा मेळा बोलवा. त्यांत अगदीं ह्मारापोरापर्यंतचे लोक असावे. त्यांनां प्रथम धर्मज्ञान देण्यास सुरुवात करावी. नंतर अशा उपकरणांच्या साहाय्यानें अलीकडील भूगोलखगोलादि विद्यांची त्यांनां माहिती द्यावी. अशा कामासाठीं तडफदार व आत्मविश्वास उत्पन्न झालेल्या सुशिक्षित तरुणांचा संघ तयार करा. हा संघ वाढेल तेवढा मोठा वाढवा. तुह्मांला जें जें सुचेल व जें जें हातून होईलसें वाटेल त्याला ताबडतोब सुरुवात करा. नदी सगळी वाहून गेल्यावर पाय न भिजवितां पलीकडे जातां येईल या आशेनें जर वाट पहात बसाल, तर जगाच्या अंतापर्यंत वाटच पहावी लागेल. वर्तमानपत्रांतील लेख वगैरे अगदीं कुचकामाचे आहेत असें माझें ह्मणणें नाहीं. पण

मी ह्मणतों, कीं, अशा मार्गानें थेट गरीबाच्या झोंपडीपर्यंत पोहोंचण्याची वेळ अद्यापि आली नाहीं, आणि आपणास तर तेंच कर्तव्य आहे. तेव्हां त्या दृष्टीनें अगदीं अल्प जरी कामगिरी झाली तरी ती फार महत्त्वाची होईल; मात्र एक गोष्ट अगोदर पक्की लक्ष्यांत बाळगा, कीं, आपणाहून हा कोणी मोठा आहे अशा प्रकारची कल्पना तुमच्याबद्दल या आपल्या अशरण बांधवांस न होईल अशी खबरदारी घ्या. तुह्मी वास्तविक त्यांचे नोकर आहां. तेव्हां तुह्मीं ही गोष्ट नेहमीं लक्ष्यांत बाळगूनच अशा कामास हात घालावा, हें बरें नव्हे काय? लोकांनीं आपणास मोठें ह्मणावें, पुढारी ह्मणावें, या आशाजलाच्या भोंवऱ्यांत सांपडून पुष्कळ मोठाल्या व शक्तिमान् अशा कार्यकारी नौकांस कायमचा जलसमाधि मिळाला आहे. तेव्हां हें तत्त्व सदैव लक्ष्यांत बाळगा व मोठेपणा आपणाकडे कधींहि येणार नाहीं, अशा शिस्तीनें कामाची मात्र शिकस्त करा. मला जें जें कांहीं सांगावेंसें वाटतें तें सर्व पत्रीं लिहितां येत नाहीं. पण त्याची जरूर तरी काय? तो सकलबुद्धिदाता तर तुमचा पाठीराखा; तो तुमच्या सन्निध उभाच आहे. हां, ठोका तर मग दुंदुभि आणि कार्यास लागा.

सदैव तुमचा,

विवेकानंद.

पत्र ९ वें.

शिकागो, ता० २३ जुन १८९४.

महाराज,

आपणास व आपल्या मंडळीस श्रीनारायणाचा आशीर्वाद असो.

आपल्या मेहेरबानीनें मला या देशांत येतां आलें, त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. येथील उदार लोकांच्या कृपेनें माझें सर्व कांहीं ठीक चाललें आहे व येथें माझी प्रसिद्धीहि बरीच झाली आहे. एकंदरीनें विचार करतां, पुष्कळ गोष्टींत हा देश सर्व जगांत अद्वितीय आहे. लोकांच्या रोजच्या व्यवहारांतसुद्धां यंत्रशास्त्राचा येथें जितका उपयोग केला जातो तितका अन्यत्र क्वचितच होत असेल. सर्व व्यवहार हें जणुं काय एखादें मोठें यंत्र चाललें असावें, असें वाटतें. एकंदर जगाच्या मनुष्यसंख्येपैकीं सुमारें एकविसांश एवढी येथील लोकसंख्या आहे, तथापि जगांतील सर्व संपत्तीचा $\frac{1}{6}$ येथील लोकांच्या ताब्यांत आहे. येथील संपत्ति जशी अपार आहे तसे तिचा व्यय करण्याचे मार्गहि अपार आहेत. येथल्या सारखी चैन पृथ्वीवर कोठेंहि सांपडणार नाहीं. एकंदर जगांत येथल्या इतकी महर्घताहि कोठें नाहीं. येथले मजुरीचे दर साऱ्या जगांत फारच जास्ती प्रमाणात आहेत; तरी भांडवलवाले व मजूरवर्ग यांचा तंटा सारखा चालूच आहे.

अमेरिकेंत स्त्रियांनां जितकें स्वातंत्र्य आहे तितकें तें त्यांनां पृथ्वीच्या पाठीवर दुसऱ्या कोणत्याहि देशांत नसेल. साधारण बुद्धिमत्तेची वाढ अमेरिकन स्त्रियांत जेवढी दिसून येते, तशी ती इतर ठिकाणच्या स्त्रियांत आढळून येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर या बाबतींत अमेरिकन पुरुषवर्गापेक्षां स्त्रीवर्गच संख्येच्या मानानेंहि मोठा आहे. एकंदर व्यवहाराचीं सूत्रें हलके हलके स्त्रियांच्या हातीं जाऊं पहात आहेत. अशा प्रकारें साधारण बुद्धिमत्तेची वाढ जरी स्त्रीवर्गांत विशेष होत आहे, तथापि यंत्रकलेंत प्रवीण व अत्यंत कुशाग्रबुद्धीचीं अशीं माणसें मात्र अद्याप पुरुषवर्गांतच आहेत.

आमचा जातिभेद हा पाश्चात्यांस आह्मांला हिणविण्याचें एक मोठें साधन होऊन बसला आहे; पण येथें त्याहूनहि वाईट अशा प्रकारचा एक जातिभेद झाला आहे. हा भेद ह्मणजे श्रीमंत व गरीब हा होय. पैसा हाच सध्या अमेरिकन लोकांचा देव होऊन बसला आहे, व त्याच्या बळावर काय वाटेल तें आह्मी करूं असें ते ह्मणतात.

या राष्ट्राइतकें कायद्याचें सूक्ष्म जाळें इतर कोणत्याहि देशांत सांपडणार नाहीं. आणि येथल्यासारखी कायद्याची अवगणनाहि इतरत्र क्वचितच होत असेल. एकंदरींत, सामान्यविचारदृष्ट्या आमचे गरीब हिंदु लोक जन्मतःच सर्व पाश्चात्यांपेक्षां नीतिमत्तेंत श्रेष्ठ आहेत. इकडील धर्माचरणाकडे पाहिलें तर त्यांत दांभिकांचाच भरणा फार. बाकीचे राहिलेले अत्यंत कोत्या विचाराचे अतएव मूर्ख. आतां जे थोडेसे विचारी लोक राहिले, त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याचें सामर्थ्य त्यांच्या सध्याच्या धर्मांत नाहीं. यामुळें स्वाभाविकपणेंच त्यांचीं मनें वेदांताकडे वळूं लागलीं आहेत व तो त्यांनां पटत आहे. नव्या भौतिकशास्त्रांच्या प्रखर भट्टींत तावूनसुलाखून निघालेल्या वेदांततत्वामृत-पानाविषयीं ही मंडळी किती उत्सुक झाली आहे, याची कल्पना प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय आपणांस करतां येणार नाहीं. केवळ शून्य स्थितींतून विश्वाची उत्पत्ति, आत्म्याची उत्पत्ति, आणि अकल्प्य अशा स्वर्गांत राहणारा व जुलमी असा तो ईश्वर, आणि सदैवकाल राहणारा नरकाग्नि, इत्यादि कल्पनांचा त्यांनां आतां अगदीं पुरा वीट आला आहे. यामुळें आत्म्याचें व सकल सृष्टीचें अमरत्व, व मनुष्याची व ईश्वराची एकरूपता, इत्यादि सुंदर वेदांतविचारांचें ते झपाट्यानें ग्रहण करूं लागले आहेत. मला वाटतें, कीं, पन्नास वर्षांच्या अवधींत वेदांततत्वें एकंदर पृथ्वीवर संचार करूं लागतील. येथील विद्वान् मिशनरी लोक आतांच बायबलाचाहि अर्थ याच धोरणानें लावूं लागले आहेत. सध्याच्या स्थितींत पाश्चात्यांस आध्यात्मिक व आह्मांला भौतिक सुधारणा जास्त पाहिजे आहे, असें माझें ठाम मत आहे.

सांप्रत हिंदुस्थानांतील सर्व दैन्याचें मूळ तेथील निकृष्ट वर्गाच्या दैन्यावस्थेंत आहे. इकडील खालचा वर्ग ह्मटला ह्मणजे शुद्ध डांकिणी व समंध यांचाच आहे. त्यांच्याशीं तुलना केली असतां आमच्याकडील निकृष्ट वर्ग ह्मणजे देवदूतांचाच वर्ग, ह्मणण्यास हरकत नाहीं. तेव्हां किती अल्प प्रयत्नानें आह्मांला आमच्या ह्या दीन बांधवांची स्थिति सुधारतां येणार आहे बरें. आह्मीं शक्य तितक्या झपाट्यानें शिक्षणाचा प्रसार या वर्गांत केला पाहिजे. त्यांच्या नष्ट झालेल्या मनुष्यत्वाची ओळख त्यांनां पटवून ती जाणीव पुनः त्यांच्यांत उत्पन्न केली पाहिजे. आमच्या राजे लोकांवर व एकंदर सुशिक्षित वर्गाच्या माथ्यावर सध्या हीच मोठी जबाबदारी आहे. या दिशेनें अद्याप मुळींच प्रयत्न झालेला नाहीं. भटांभिक्षुकांनीं केलेला जुलूम व कित्येक शतकेंपर्यंत चालू असलेली परकीय सत्ता, अशा दुहेरी जात्यांतून भरडून निघालेल्या लोकांनां आपल्या माणुसकीचीसुद्धां जाणीव राहिली नाहीं, यांत नवल तें काय? त्यांनां ही जाणीव उत्पन्न करून दिली पाहिजे. जगांत काय चाललें आहे याकडे त्यांची दृष्टि वळविली पाहिजे, ह्मणजे मग आपल्या उन्नतीचा मार्ग ते आपणच आमच्या मदतीशिवाय शोधून काढतील. प्रत्येक स्त्रीनें, प्रत्येक पुरुषानें आणि नंतर एकंदरींत प्रत्येक राष्ट्रानें आपला उद्धार करून घेतला पाहिजे. फक्त त्यांनां बोटानें दिशा दाखविणें एवढेंच आमचें कर्तव्य. तें आह्मीं केलें ह्मणजे पुढील गोष्टी ठरल्याप्रमाणें अचूक घडून येतील. माझ्या मनांत कित्येक वर्षें या कल्पना घोळत आहेत. त्यांनां मूर्त स्वरूप देण्याचें तेथें जुळेना ह्मणून मी इकडे आलों. निकृष्ट वर्गाच्या शिक्षणाच्या या कार्यांत अतिशय मोठी अडचण ह्मटली ह्मणजे दारिद्र्याची. आपल्यासारख्या महाराजांनीं कांहीं मोफत शिक्षणाच्या शाळा सुरू केल्या, तरी त्यांचा काय उपयोग? जेथें मुलाला तें जरा जाणतें झालें, कीं, शेतांत खपून अगर दुसरी कांहीं मोलमजुरी करून आपलें पोट कसेंबसें भरावें लागतें, तेथें तुमच्या त्या फुकट शाळांतून येणार कोण? तेव्हां डोंगर जर महंमदाकडे येईना, तर महंमदानें उठून डोंगराकडे गेलें पाहिजे. तसेंच मुलांनां जर शिक्षणाकडे येववत नाहीं तर शिक्षणानें उठून त्यांच्याकडे जावायास पाहिजे. पण हें व्हावें कसें? आपल्या देशांत हजारों संन्याशी

धर्मशिक्षण देण्यासाठीं गांवोगांव फिरत असतात. यांपैकींच कांहीं लोकांचा एक संघ तयार करून त्यांनां जर व्यावहारिक शिक्षणहि द्यावयास लावलें, तर धर्मतत्वांबरोबरच ऐहिक शिक्षणाचाहि फायदा आमच्या खालच्या वर्गास घरबसल्या अनायासें करून देतां येणार आहे. त्यांनीं आपल्या व इतर देशांतील लोकांच्या इतिहासांतील गोष्टी रसभरित भाषेनें लोकांनां सांगण्याचा क्रम ठेविला, तर त्यापासून त्यांनां इतिहासाची केवढी तरी माहिती होईल. या कार्यासाठीं प्रथम माणसें पाहिजेत आणि नंतर पैसाहि हवाच. हिंदुस्थानांत माणसें पुष्कळ आहेत; पण दुर्दैवानें पैसा नाहीं. एखाद्या यंत्रास वेग देणें फार कठीण काम आहे; पण एकदा त्याला गति दिली तर मग तें वाढत्या प्रमाणावर वेगानें सतत चालू राहील. या कार्या-करितां आमच्या देशांतील लक्ष्मीपुत्रांकडे बहुत काळ याचना करून पूर्ण निराश झाल्यानंतर आपल्या मदतीनें या देशांत मीं पाय ठेविला. हिंदुस्थानांतील गरीबदुबळे मेले काय अथवा जिवंत राहिले काय, अमेरिकन लोकांनां त्याची फारशी पर्वा नाहीं. आणि त्यांनीं पर्वा तरी काय ह्मणून करावी? खुद्द आमच्या लोकांनां जर स्वतःच्या स्वार्थापलीकडे कांहीं सुचत नाहीं तर परक्यांनां तरी कां बोल लावावा?

उदार राजपुत्रा ! हा नरदेह क्षणभंगुर आहे; जगांतील सगळी संपत्ति, सगळे डामडौल चिरकाल टिकणारे नव्हत. पण ज्यांनीं केवळ परोपकारा-करितां देह झिजविले आहेत ते मात्र अक्षय्य झाले आहेत. बाकीचे जिवंत असून मेलेलेच होत. राजपुत्रा! तुझ्यासारखा हिंदुस्थानचा एक सुपुत्र आपलें कर्तव्य ओळखून त्याप्रमाणें वागेल तरीहि आमच्या आतांच्या स्थितींत तो आह्मांला पुष्कळच मदत करूं शकेल व त्यायोगें तो अखंड कीर्तिहि संपादील.

अज्ञानपंकांत लोळत पडलेल्या आपल्या दीन बांधवांचें कांहींतरी बरें करण्याची सुबुद्धि ईश्वर आपणास देवो, अशी सदैव प्रार्थना करणारा,

आपला,

विवेकानंद.

पत्र १० वें.

ता० २९ सपटंबर १८९४.

आशीर्वाद वि.—

माझ्या शूर मुलांनो ! तुह्मीं सर्वांनीं स्वार्थत्यागांतील यज्ञांत पहिली आहुति फारच चांगली दिली आहे. तुमच्या या कृतीनें आज माझ्या अंगावर मूठभर मांस आलें आहे. निराश होऊं नका. एवढ्या झपाट्यानें आरंभ केल्यानंतर आतां जर काम अर्धें सोडाल तर मग तुमच्यासारखे मूर्ख तुह्मीच !

आपलें सध्याचें कार्यक्षेत्र हिंदुस्थानच आहे, आणि आपल्या कृतीचें कौतुक साऱ्या जगानें करावें असें वाटत असेल तर हिंदुस्थानांत आपण जागृति उत्पन्न केली पाहिजे. एवढ्याच कामाच्या मागें लागा. जेथून सर्वत्र ही लाट पसरणार तो मध्यबिंदु अगोदर चांगला स्थिर करा. अपयशाच्या भीतीची कल्पनासुद्धां मनांत आणूं नका. सर्व कांहीं ठीक होईल यांत संशय नाहीं. आपल्या इच्छाशक्तीनें आपण सारें जग हालवून सोडूं.

आपल्यांतील कांहीं तरुण ख्रिस्ती होत आहेत, हें पाहून तुह्मीं वाईट वाटून घेऊं नका; सांप्रतच्या रूढींनीं जखडलेल्या समाजांत असें न व्हावें तर व्हावें तरी काय? कोणत्याहि समाजाच्या वाढीस आधीं स्वातंत्र्य पाहिजे. तुमच्या पूर्वजांनीं आत्म्याला सर्व स्वातंत्र्य दिलें आणि त्यामुळें धर्माची वाढ झाली. त्यांनीं शरीराला पूर्ण पारतंत्र्यांत ठेवलें, त्यामुळें समाजाची वाढ खुंटली. पाश्चात्य देशांतील प्रकार याच्या उलट आहे. तेथें समाजास पूर्ण स्वातंत्र्य आहे, धर्माला नाहीं. दोहींकडे या दोन निरनिराळ्या उणीवा आहेत, त्या भरून निघण्यास आतां कोठें सुरुवात झाली आहे.

हिंदुस्थानाला बाह्य अथवा भौतिक सुधारणेची फार जरुरी आहे; यासाठीं यंत्रकला व इतर शास्त्रीयज्ञान यांचा प्रसार आपल्या देशांत होईल

तितक्या झपाट्यानें केला पाहिजे. पाश्चात्यांनां मिळेल तेवढें तत्वज्ञान हवें आहे. ते आध्यात्मिक सुधारणेंत अगदीं मागसलेले आहेत. हिंदुस्थानांतील लोकांच्या वृत्ति कित्येक शतकेंपर्यंत धार्मिक बनून गेल्यामुळें धर्माच्या पायावर नसलेले व त्या वृत्ति जागृत केल्याखेरीज होणारे कोणतेहि सुधारणेचे प्रयत्न निष्फल झालेच पाहिजेत. हिंदुस्थानांतील धर्माचा उच्छेद झाल्याखेरीज तेथें सुधारणा होणार नाहीं असें जें तेथील पहिल्या सुधारकांस वाटलें, तीच त्यांची मोठी चूक झाली. याचें कारण इतकेंच, कीं, त्यांच्यापैकीं बहुधा कोणींहि हिंदुधर्मतत्त्वांचा आस्थेनें अभ्यास केला नव्हता, व सर्व धर्मांची जी प्रत्यक्ष जननी त्या हिंदुधर्मांतील खरें रहस्य जाणण्याला जें शिक्षण अवश्य आहे तें त्यांपैकीं एकालाहि प्राप्त झालें नव्हतें. आपली सध्याची स्थिति सुधारण्यास आपला धर्म सोडावयास नको, असें मी पुन्हां स्पष्टपणें सांगतों. किंबहुना आपल्या धर्माची ओळख बुजाल्यामुळेंच आपणांस ही दशा आली आहे, असें मी ह्मणतों. आणि हें साधार सिद्ध करण्याची माझी तयारी आहे. आपण याच दिशेनें काम केलें पाहिजे असें मला वाटतें, व देहबंध असेपर्यंत माझें ह्मणणें प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध करण्यास मी झटेन. आतां हें व्हावयास दिनावधि अवश्य लागणार, पण धीर सोडतां उपयोगीं नाहीं. **'उद्धरेदात्मनात्मानम्'** हें सदैव ध्यानांत धरलें पाहिजे.

धर्मज्ञानदानाची सध्याची पद्धति अगदीं चुकीची झाली आहे. ज्याला धार्मिक ज्ञान हवें असतें त्यानें संसार जवळ जवळ सोडला पाहिजे, जगांतील चैनींपासून अगदीं अलिप्त राहिलें पाहिजे, असें सांप्रत झालें आहे; ही परिस्थिति बदलली पाहिजे. आणि यासाठीं आपणास तात्विक धर्माचा चांगला अभ्यास केला पाहिजे. ह्मणजे आपल्या चालू स्थितींत त्या तत्वांचा प्रत्यक्ष उपयोग कसा करतां येईल हें समजेल. सावकाश व धीर न सोडतां हें काम केलें पाहिजे.

आपला,

विवेकानंद.

पत्र ११ वें.

मु० वाशिंग्टन, ता० २७ आक्टोबर १८९४.

प्रियबंधु—

जशी माझी हिंदुस्थानांत वागणूक होती तशीच तंतोतंत ती मीं येथेंहि ठेविली आहे. पुढें अमुक करावें कीं काय वगैरे कालावधीचे बेत मी करित बसत नाहीं. माझा सर्व भार ईश्वरावर आहे.

येथें मला सध्या इतकें काम करावें लागत आहे, कीं, आपण ह्मणतां त्याप्रमाणें एका ग्रंथांत माझे सारे विचार ग्रथित करण्यास मला वेळ नाहीं. माझ्या तर्फे जो कार्यभाग सध्या आपण व माझी इतर स्नेही मंडळी मिळून करित आहां, त्याबद्दल मीं आपले किती आभार मानूं? मी तेथें असतों तरी ही सारी जुळवाजुळव माझ्यानें झाली नसती. अशी जुळवाजुळव करण्यास लागणारें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. ज्ञानसंपादन करावें व सदैव विचारमग्न असावें, हेंच स्वभावतः मला आवडतें. आतां सध्या व्याख्यानें बंद करून सद्गुरुप्रेरणेनें जे कोणी माझ्याकडे अभ्यासाकरितां येतात त्यांनां कांहीं शिकवावें असा माझा बेत आहे. आतां कार्य काय करावयाचें आहे याची तुह्मांला पूर्ण कल्पना आली आहे. तेव्हां तें करण्यास तुमच्यासारख्या तरुणांनींच कंबर बांधिली पाहिजे, आणि तुह्मीं आतां आरंभहि केला आहे. मी तुमचा पुढारी ह्मणजे केवळ नांवाचा आहें. मी तर बोलूनचालून त्यागी आहें. माझी आतां एकच इच्छा उरली आहे. धाय मोकलून रडणाऱ्या माझ्या हजारों विधवाभगिनींचें दुःखाश्रुमार्जन करण्यास व भुकेनें पटापट प्राण सोडणाऱ्या माझ्या लेंकरांच्या मुखांत अन्नाचा एक तरी घांस पडेसा करण्यास एखादा राजरस्ता शोधून काढण्याची माझी इच्छा तृप्त झाली नाहीं व नष्टहि झाली नाहीं. हिंदुधर्मांतील तत्वें कितीहि उच्च असलीं, व वेदांतपट कितीहि सूक्ष्म विणलेला असला,

तरी जोंपर्यंत तीं तत्वें वागणुकींत प्रत्यक्ष उतरत नाहींत व दुःखविमोचनाचा आपला कार्यभाग करित नाहींत तोंपर्यंत तीं तत्वें जन्मास आलीं काय आणि न आलीं काय, माझ्या दृष्टीनें त्यांची किंमत सारखीच आहे ! नुसता पुस्तकी धर्म तो धर्मच नव्हे. नजर सदैव पुढें असावी, अशीच रचना डोळ्यांचीसुद्धां केली आहे. तेव्हां आतां भविष्यत्कालाकडे पाहून वेदांततत्वांचें प्रत्यक्ष आचरण करूं लागा, ह्मणजे ईश्वर आपला वरदहस्त तुमच्या मस्तकावर ठेवील.

आतां माझ्याकडे पाहूं नका, आपल्या स्वतःकडेच पहा. तुह्मांला इतका उत्साह प्राप्त होण्यास मी अंशतः कारण झालों, याचा मला आनंद वाटतो. आतां त्याच उत्साहाची कांस धरून रहा, ह्मणजे यशःप्राप्ति दूर नाहीं. तुमच्या बांधवांसंबंधानें तुमच्या हृदयांत खरें खरें प्रेम आहे काय? तें असलें तर तुह्मांला कोठेंच अपजयाची भीति नको. आज नाहीं उद्यां पण यश हें आलेंच पाहिजे. किंबहुना तुमच्या यशापयशावरच मी तुमच्या बंधुप्रीतीची कसोटी लावीन ! तुह्मांला अपयश आलें तर खरें प्रेम तुमच्या हृदयांत नव्हतेंच, असें मी समजेन. मी ह्मणतों या मार्गांत तुह्मी आपलें स्वतःचेंच हित आधीं केवढें तरी साधित आहां याची तुह्मांला कल्पनातरी आहे काय? तुह्मांला ईश्वराची भेट हवी आहेना? तर मग भुकेनें मरणाऱ्या या हजारों चालत्याबोलत्या ईश्वरांची सेवा करा, ह्मणजे तो परमात्मा तुह्मांला खास भेटेल. अरे, गंगेच्या पाण्यांत नुसत्या बुड्या मारून काय फायदा? ईश्वर गंगेंत बुडी मारून बसला नाहीं ! या चालत्याबोलत्या ईश्वरांची प्रथम खरी भक्ति करा. त्यांच्याबद्दल आदर व प्रेम बाणलें पाहिजे, ह्मणजे खऱ्या प्रेमांत केवढें सामर्थ्य असतें तें तुह्मांला प्रत्यक्षपणें पटेल.

पुन्हा एकवार सांगतों, कीं, मोठ्या नांवाच्या लालसेनें, जगाच्या जयजयकाराच्या इच्छेनें, कांहींसुद्धां करूं नका ! वर्तमानपत्रें काय ह्मणतात याच्याकडे मी फारसें लक्ष्य ठेवित नाहीं. तुमच्यांत खरा प्रेमाचा उमाळा आहे काय? तर मग तुह्मी अजिंक्य आहां. तुमच्याजवळ खरा स्वार्थत्याग आहे काय? तर मग तुमच्या आड येण्याची कोणाची छाती नाहीं.

खरें प्रेम आणि पूर्ण स्वार्थत्याग ज्यांच्याजवळ आहे अशा आपल्या लेंकरांचा पाठीराखा परमेश्वर आहे. तुह्मांला बुडविण्याच्या इच्छेनें सगळा जलनिधि जरी कोपला तरी तो आटवून टाकण्याचें आपलें सामर्थ्य तो तुमच्यासाठीं प्रगट करील. भरतभूमीला आज असल्या मुलांची जरूरी आहे. ती वाण तुह्मी भरून काढा.

मी तिकडे निघून यावें असें सारे ह्मणतात, ह्मणून लिहितां. मी तेथें आल्यानें कांहीं मोठा कार्यभाग होणार आहे, असा त्यांचा समज झालेला दिसतो; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. यांचा हा उत्साह क्षणिक असेल अशीहि मला भीति वाटते. जर हा उत्साह खरा व टिकाऊ असेल तर शेंकडों वीर मदत देण्यासाठीं तुह्मांकडे धावून येतील. तेव्हां आतां आत्मविश्वास धरा आणि कार्यास लागा. तुमच्या मनांत मीं तेथें येऊन निरनिराळ्या पंथवाल्यांबरोबर वादविवाद करावे, असें आहे काय? तर मग मी तुह्मांला सांगतों, कीं, असले वाद करण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं! मी ईश्वराचा सेवक आहें आणि योग्य ठिकाण पाहून त्याची सेवा करावयाची हेंच माझें काम. तें योग्य ठिकाण सध्या मला येथेंच सांपडलें आहे. येथें एकजण माझ्या विरुद्ध बोलला तर शेंकडों माझ्या बाजूनें बोलावयास उभे राहतील. हृदय ह्मणून कांहीं चीज आहे, इतकी तरी येथील लोकांनां ओळख आहे; आणि येथला स्त्रीवर्ग ह्मणजे मंगलमयी देवतांचाच वर्ग आहे. आतां माझी येथली कीर्ति तेथें गेली आहे तेव्हां माझ्याविरुद्ध खटपट करण्यास कोणी फारसा धजणार नाहीं, ह्मणून मी आतां तेथें येऊं काय? तर मग आतां नुसत्या स्तुतिपर भाषणांच्या रेलचेलींत लोळण्या-करितां मीं तेथें यावें, असें तुमचें ह्मणणें? विजयाची पक्की खात्री झाल्यानंतर एखाद्या भागुबाईनेंसुद्धां शूरत्वाच्या गोष्टी सांगण्यास काय नड आहे! पण माझ्या जिवलग मित्रा! तूं पक्कें लक्ष्यांत ठेव, कीं, ज्याला खरें कामच करावयाचें असतें तो शांतपणें व लोकांच्या लक्ष्यांतहि न येऊं देतां काम करित असतो. ज्यांचा आवाज लोकांच्या कानांवर कधींहि गेला नाहीं, असे किती तरी बुद्ध आजवर होऊन गेले आहेत व पुढेंहि होतील. माझ्या मुक्तीविषयीं ईश्वरावर जसा माझा भरंवसा आहे, तसा दीनांसाठीं

काम करणें या उपायावरहि आहे. एखाद्या खितपत पडलेल्या नरकांतल्या किड्याला माझ्या संगतीनें जर फायदा होण्याचा संभव असेल, तर त्यासाठीं नरकवास भोगण्याचीसुद्धां माझी तयारी आहे. मला येथें राहणेंच फार सुखाचें आहे. अरे, पाश्चात्यांचें नांवसुद्धां घेण्याची तुमची योग्यता नाहीं! ज्यांनीं आज मला अन्न दिलें,आसरा दिला व आपल्या मित्रत्वाचा आधार दिला, त्यांनां सोडून मीं काय ह्मणून निघून यावें ? ज्यांनीं मला आधार दिला त्यांत अगदीं जुन्या कर्मठ पंथाचेहि ख्रिस्ती लोक आहेत. एखादा मिशनरी हिंदुस्थानांत आला, तर तुह्मी त्याच्याशीं कसे वागतां बरें? म्लेंच्छ म्लेंच्छ ह्मणून तुह्मी त्याला शिवतसुद्धां नाहीं! मला खास वाटतें, कीं, ज्या दिवशीं या म्लेच्छ शब्दाची उत्पत्ति झाली, त्याच दिवशीं हिंदुस्थानच्या विनाशकालाला सुरुवात झाली! अशा रीतीनें सगळ्या जगापासून अलिप्त राहून तुह्मी आपल्या सुधारणा कशा करणार? असला माणुसघाणेपणा–परकीयांचा द्वेष कधींहि मनांत न शिरूं देण्याबद्दल फार खबरदारी घेतली पाहिजे. बाबारे! वेदांततत्वें तोंडानें बोलणें फार सोपें असतें पण प्रसंग पडला ह्मणजे त्याचें अंशतःसुद्धां पालन करणें जड जातें!

सदैव आपला हितेच्छु,

विवेकानंद.

ता. क.—

अधिकाराची हांव आणि मत्सर या दोन शत्रूंबद्दल फारच सावधगिरीनें वागत जा, आणि आत्मविश्वास वाढविण्याची खटपट सदैव चालू राहूं द्या.

विवेकानंद.

पत्र १२ वें.

ता० १९ नोव्हेंबर १८९४.

आशीर्वाद वि.—

माझ्या शूर मुलांनों! असेंच काम चालूंदे. खरें प्रेम, खरी कळकळ आणि धीर या तीन अजब वस्तु आहेत. यांच्या जोरावर हवी ती सिद्धि मिळवितां येते. दुसऱ्या कोणत्याहि वस्तूची जरूर लागत नाहीं. मनुष्याच्या जीविताचें सारें रहस्य त्याच्या वाढींत आहे. त्यानें दिवसेंदिवस वाढत, मोठें होत, गेलें पाहिजे. पूर्ण मनुष्य ह्मणजे ज्याची पूर्ण वाढ झाली आहे, ज्याला त्याची विश्वव्यापकता अनुभवानें पटली आहे, असा मनुष्य होय. हा शेवट सिद्ध करण्याचा मार्ग ह्मणजे प्रेम. मनुष्याला स्वतःइतकें दुसरें कांहींसुद्धां प्रिय नाहीं. ह्मणजे त्याच्या साऱ्या जीविताचें रहस्य आत्मप्रेम. त्याचीच खूण धरून तें वाढवित गेलें ह्मणजे त्याचाच विश्वव्यापी वृक्ष होईल. तेव्हां या हेतूनेंच जो जगेल तो खरा जगला ह्मणावयाचा, आणि याच्या उलट मार्गानें जाणारा ह्मणजे केवळ आपल्या इंद्रियसुखार्थ जगण्याची इच्छा करणारा तो मृत्पिंडच समजला पाहिजे, हें उघड होत नाहीं काय? परोपकार हें जगणें व वाढणें, आणि याच्या उलट केवळ आत्मसुखलालसेनें जगणें ह्मणजे वाढ खुंटवून मृत्युपंथास लागणें, असेंच झालें नाहीं काय? सध्या तुझ्या भोंवतीं दिसणाऱ्या माणसांत शेंकडा नव्वद मेलेले लोक आहेत. तीं खरीं माणसें नसून आकारानें मात्र माणसांसारखीं दिसणारीं पिशाचें होत. माझ्या वरील व्याख्येप्रमाणें खरोखर जीवंत असे कितीसे सांपडतील? माझ्या बाळांनों! तुमच्या अंतःकरणांत दुसऱ्याबद्दल थोडी तरी खरी कळकळ बाळगा. खरें ह्मटलें तर या कळकळीनें तुह्मीं वेडें बनलें पाहिजे. तुमचीं हृदयें उडण्याचें बंद झालें पाहिजे व मेंदूंत अगदीं खळबळ उडून गेली पाहिजे. इतकी तुमची अवस्था झाल्यावर परमेश्वराकडे जा आणि आपलें हृदय

कांहीं आडपडदा न ठेवितां त्याच्यापाशीं उघडें करा, ह्मणजे तोच तुह्मांला वाटाड्या होईल व तुह्मांला अमोघशक्ति व कधींहि न थकणारें बुद्धिसामर्थ्य देईल. एकसारखी खटपट करित रहा. रात्र पडून अगदीं दिसेनासें झालें ह्मणजे मला कांहीं काम करावयाचें आहे, खटपट करावयाची आहे, अहमहमिकेनें पुढें जावयाचें आहे, या मंत्राचाच मी जप करित असें, आणि उजाडलें तरी तोच माझा मंत्र चालू असे. आतां तुह्मांला भीती कशाची? अशा दीनवाण्या मुद्रेनें आकाशांत पसरलेल्या तारकासमूहाकडे काय पाहतां? त्या सगळ्या तारका एकदम कोसळून तुमच्यावर पडतील अशी तुह्मांला भीति वाटते काय? थांबा, जरा वाट पहा, ह्मणजे याच तारका कांहीं तासांनीं तुमच्या पायाखालीं येतील! ही फळप्राप्ति पैशानें होत नसते. जगाच्या जयजयकारानें होत नसते, कीर्तीनें होत नसते, कीं, विद्वत्तेनें होत नसते! ही प्राप्ति फक्त एका प्रेमानें होणार आहे! शुद्ध दानत ही पर्वतप्राय अडचणींचा चुरा करून पुढें जात असते.

आपणास स्वातंत्र्य पाहिजे व तें कसें मिळेल हेंच सध्या आपल्यापुढें मोठें कोडें आहे. आमच्या पूर्वजांनीं धर्मासंबंधानें पूर्ण मोकळीक ठेविली होती आणि त्याचा परिणाम आज सगळ्या जगाला प्रकाश देणाऱ्या धर्माची निष्पत्ति हा होय. पण समाजघटनेकडे पाहिलें तर त्याच्या पायांत मात्र त्यांनीं भल्या मोठमोठ्या बिड्या घालून ठेविल्या, आणि त्याचा परिणाम काय तर आजन्म दास्य! आतां पाश्चात्यदेशांकडे पहा. तिकडे समाज अगदीं स्वतंत्र, आणि याचा परिणाम काय झाला तो दिसतोच आहे. याच्या उलट धर्माच्या बाबतींत त्यांची स्थिति आहे.

सर्व वाढीला पहिली आवश्यक गोष्ट ह्मणजे स्वातंत्र्य. स्वातंत्र्य जसें आचारविचारांत पाहिजे तसें तें खाण्यापिण्यांत पाहिजे, कपड्यालत्त्यांत पाहिजे व विवाहसंबंधानेंहि त्याच स्वातंत्र्याची जरूर आहे. मात्र अशा स्वातंत्र्यापासून दुसऱ्यास उपसर्ग होणार नाहीं, एवढी खबरदारी घेतली ह्मणजे पुरे.

हल्लींच्या जड सुधारणेविरुद्ध बोलण्यास आह्मांला भारी अवसान येत असतें; पण ही भौतिक सुधारणा आह्मांला कां नको, तर द्राक्षें आंबट

ह्मणून ! ही सुधारणा खरोखरच धार्मिक उन्नतीच्या आड येते असेंहि घटकाभर गृहीत धरलें, तरी **काया वाचा मनानें** केवळ आध्यात्मिक उन्नतीच्याच मार्गे लागलेले असे कितीसे खरे महात्मे आज हिंदुस्थानांत आहेत बरें ? अशीं माणसें एक लक्ष आहेत ह्मटलें तर अगदीं डोक्यावरून पाणी गेलें ! आतां तुमचें असें ह्मणणें आहे काय, कीं, या एक लक्ष माणसांच्या उन्नतीकरतां ३० कोटि लोकांनीं खुशाल रडत बसावें ? मुसलमानांनीं स्वाऱ्या करून हिंदुस्थान पादाक्रांत कां केलें ? भौतिक सुधारणेंत हिंदुलोक अगदीं मागसत चालले होते हेंच त्याचें कारण होय. नीटनेटका पोषाख कसा करावा हेंसुद्धां मुसलमानांपासूनच आह्मी शिकलों आहों. साधी ऐहिक सुधारणाच काय, पण गरीबांस नवे नवे धंदे मिळतात ह्मणून चैनीची सुद्धां मी तरफदारी करीन ! कांहीं लोक तरी चैनी आहेत ह्मणून कित्येक गरीबांस भाकरी तरी मिळते. मी मेल्यानंतर सगळे स्वर्गभोग मला प्राप्त होणार असून या जगांत माझें वास्तव्य आहे तोंपर्यंत रोजची भाकर मला मिळाली नाहीं तर अशा देवाला मी देवच समजत नाहीं ! हिंदुस्थानाची जर कधीं काळीं खरी सुधारणा होणें असेल तर प्रथम भौतिक सुधारणेखेरीज गत्यंतर नाहीं. जास्त प्रमाणावर विद्यादान, जास्त उद्योगधंदे, जास्त अन्न आणि मग जास्त शरीरसामर्थ्य, अशी ही शिडी आहे. मग धार्मिक बाबतींत रूढिबद्ध झालेला भिक्षुकवर्ग आणि त्यांनीं निर्माण केलेल्या रूढि यांचा संहार झाला पाहिजे. इंग्रजांकडून जास्त अधिकार मिळविण्याकरितां सभा भरविण्यांत आमचा तरुणगण सध्या दंग झाला आहे. पण या सभांबद्दल इंग्रज लोक मनांतल्या मनांत तुमची थट्टा मात्र करतात. हानिकारक रूढींची शृंखला अडकवून दुसऱ्यांनां गुलाम करणारे स्वतः स्वतंत्र राहण्यास योग्य आहेत काय ? इंग्रज लोक जरी उद्यां हिंदुस्थान आपखुषीनें सोडून गेले, तरी तुह्मांला खरा लाभ काय होणार आहे ? ज्या चिच्छक्तीनें हें जग चाललें आहे ती जागृत होऊन तुह्मांला त्या स्वातंत्र्याचा उपभोग घेऊं देणार नाहीं. रूढीच्या दास्यपंकांत लोळणाऱ्या गुलामांनों ! तुह्मांला स्वातंत्र्य कशाला हवें ? आणखी नवे गुलाम करण्याकरतां होय ?

युरोपियन लोकांचें रूढिस्वातंत्र्य आणि आमचें धार्मिक जीवन या दोहोंचें एकवटलेलें सुंदर स्वरूप आमच्या देशास आह्मांला प्राप्त करून द्यावयाचें आहे, आणि हें काम धीरे धीरे करून कालावधीनेंच साध्य होणारें आहे. तेव्हां आमचे हे सर्व विचार ज्यांनां पटतील अशा तरुणांची एक संस्था निर्माण केली पाहिजे. नंतर वाढवित वाढवित आह्मांला या संस्थेच्या शाखा साऱ्या हिंदुस्थानभर पसरून दिल्या पाहिजेत. या कामाला अगदीं लहानशा प्रमाणावर आरंभ करून लोकांनां खऱ्या तात्विक धर्माची ओळख करून देण्याचें काम तुह्मी प्रथम हातीं घ्या. कोणत्याहि चालीविरुद्ध स्वतः बंडावा करण्याचें काम करूं नका. मात्र तात्विक धर्मास अनुसरून स्वतःचें आचरण ठेवा. शंकराचार्य, रामानुज, चैतन्य इत्यादिकांनीं सांगितलेला धर्म लोकांनां समजावून देऊनच सर्व सुधारणांचें बीज चांगलें पेरलें जाईल.

दांडग्या उत्साहानें तुह्मीं सर्वांनीं हें काम केलें पाहिजे. आपण लोकांचे नोकर आहों,हें विसरूं नका. निस्वार्थी व्हा आणि कोणाच्या चहाड्या ऐकूं नका. धीर धरून काम करा, ह्मणजे यश ठेवलेलेंच आहे. आणखी एका गोष्टीबद्दल तुला स्वतःला एक सावधगिरीची सूचना करावयाची आहे. कोणतेंहि काम करतांना आपला वरचष्मा न चालविण्याविषयीं खबरदारी घे. मी हीं पत्रें तुलाच लिहितों, एवढ्यावरून तूंच कायतें माझें सर्वस्व असें माझ्या इतर मित्रांनां भासविण्याचा प्रयत्न करूं नको. तूं इतका मूर्ख नाहींस, हें मला ठाऊक आहेच; तरी पण सूचनार्थ लिहिलें आहे. असल्या वरचढपणानें चांगल्या संस्था नामशेष होत असतात.

तसेंच दांभिकपणापासून नेहमीं दूर रहात जा. कोणतेंहि काम असो, त्यांत या रिपूची छायासुद्धां पडूं देऊं नको. कीर्ति वाढविण्याकरितां तर राहूंच दे, पण एखादें चांगलें काम देखील दांभिकपणा करून होत असेल तर तें देखील मला नको. ह्या रिपूचा यत्किंचित्‌हि वारासुद्धां न लागतां मला मरण आलें ह्मणजे मिळविली, असें मला वाटतें.

आंत एक, बाहेर एक, असलीं सोंगेंढोंगें आह्मांला नकोत. कोणी सद्गुरूच्या विशेष कृपेंतले आणि कोणी गैरमर्जींतले ! आपल्या शिष्यांत

असला भेदभाव करणारा गुरूच आह्मांला नको! तुझ्याजवळ खरें प्रेम, खरी कळकळ आणि खरा स्वार्थत्याग असला ह्मणजे तुझ्या प्रगतीला रोध करण्यास कोणीहि समर्थ नाहीं.

थिऑसफीमुळें माझा येथला मार्ग जास्त सुकर झाला असें तुला ते सांगतात काय? शाबास! आतां मात्र कमाल झाली! अरे, हा अगदीं निर्भेळ मूर्खपणाचा मासला आहे. पण जाऊंदे, ज्याला वाटेल तसें त्यानें बोलावें.

केवळ सत्याच्याच प्रकाशानें चाल. यांत यश येण्यास कदाचित् अवधि जास्त लागेल इतकेंच. तुह्मांपैकीं प्रत्येकाला असें वाटलें पाहिजे, कीं, सर्व कामाचा बोजा काय तो एकएकट्यावरच आहे. साऱ्या हिंदुस्थानाचें बरेंवाईट आज घटकेस माझ्या एकट्याच्याच कृतीवर अवलंबून आहे, असें तुह्मांपैकीं प्रत्येकाच्या अंतःकरणास नेहमीं वाटत राहिलें पाहिजे. हजारों वर्षांमागील तुमचे पूर्वज आज तुमच्या कृतीकडे डोळे लावून बसले आहेत, हें ध्यानांत धरा.

मला तिकडे केव्हां येतां येईल हें निश्चित सांगतां येत नाहीं. अद्याप इकडे काम पुष्कळ आहे. मी तेथें आलों तर आमचे लोक पुष्कळशा सभा भरवितील आणि स्तुतीची रेलचेल उडेल; पण यापलीकडे काय होणार आहे? त्यांच्या पिशवीचें तोंड जरा तरी जास्त खुलें होईल काय? छे, नांव कशाला घेतोस! अरे, या जन्मदारिद्र्यांनीं द्यावें काय आणि घेणारानें घ्यावें काय? आपल्याशिवाय जगांत दुसरीं कोणी माणसें रहातात, ही गोष्टसुद्धां आज दोन हजार वर्षांपूर्वींच ते विसरले आहेत! राष्ट्र आणि समाज या शब्दांची अंधुक अंधुक कल्पना आतां नुक्ती त्यांनां येऊं लागली आहे; तेव्हां त्यांनां तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे?

विवेकानंद.

पत्र १३ वें.

मु० दार्जिलिंग, ता० ६ एप्रिल १८९७.

'भारती' मासिक पुस्तकाच्या संपादिकाबाई, यांसः—

प्रिय भगिनी,

आपण 'भारती'चा अंक पाठविला, त्याबद्दल मी आपला फार ऋणी आहें. मीं जें काम हातीं घेतलें आहे त्याबद्दल आपण संमति दर्शविली, हें पाहून मला फार आनंद होतो.

आपल्या या हतभाग्य देशांत केवळ लोकोपकारार्थच जगणारे पुरुष विरळा, आणि आहेत त्यांचें कौतुक करून त्यांनां उत्तेजन देणाऱ्या स्त्रिया तर त्याहून विरळा ! यामुळें आपणासारख्या सुबुद्ध व सुशिक्षित बंगाली स्त्रीनें दिलेल्या उत्तेजनाचें महत्त्व माझ्या दृष्टीनें कितीतरी मोठें आहे. आपणासारख्या उदारधी स्त्रिया भरतखंडास आणखी पुष्कळ लाभाव्या, व त्यायोगें भरतभूमीच्या कल्याणाचा मार्ग खुला व्हावा, एवढीच माझी त्या जगन्नियंत्यापाशीं प्रार्थना आहे.

आपण भारतीच्या अंकांत माझ्याविषयीं जें लिहिलें आहे, त्या संबंधानें आपणास कांहीं सांगावेंसें वाटतें. धर्मज्ञानप्रसारार्थ बाहेर देशीं जाण्यांत माझा उद्देश माझ्या जन्मभूमीच्या उद्धारार्थ खटपट करण्याचाच होता. पाश्चात्यांच्या मदतीशिवाय आपणांस कांहीं विशेष करतां येणार नाहीं, असा माझा ठाम समज झाला आहे. आमच्या देशांत कोणी खटपट करूं लागल्यास त्याला अद्याप चांगलीशी मदत मिळत नाहीं व त्याच्या कामाची फारशी ओळख करून घ्यावी असेंहि कोणाला वाटत नाहीं. आणि सर्वांत मोठी अडचण ह्मणजे व्यावहारिक अडचणींची. आमच्यापाशीं कल्पकता हवी तेवढी आहे; आह्मांला बुद्धि आहे पण काम करणारांची जबर वाण आहे; आह्मांपाशीं वेदान्तासारखीं सर्वव्यापी व सुंदर तत्त्वरत्नें आहेत, पण

तीं कृपणाच्या धनासारखीं सात कुलपांच्या आंत आहेत व त्यांच्या किल्ल्या हरवल्यामुळें तीं कृतींत कोठेंच दिसत नाहींत. सर्व सृष्टि ईश्वरस्वरूप आहे हा आमचा सिद्धांत; पण व्यवहारांत पहावें तर कोण भेदभाव! केवळ परसेवेकरतां जगावें, हें तत्त्व पहिल्यानें हिंदुस्थानांतच जन्मास आलें; आणि व्यवहारांत पहावें तर आह्मी नित्य त्याला मूठमाती देण्यास तयार. आह्मांला स्वतःशिवाय कांहींच दिसेनासें झालें आहे!

आतां आह्मांला या नाना प्रकारच्या अडचणींतून डोकें वर काढण्याची खटपट करावयाची आहे. अडचणी जबरदस्त आहेत पण त्याला उपाय काय? हजारों भयंकर यातनांनीं भरलेल्या या संसारांत राहून एका हातानें दुःखाश्रु पुशित असतां तेवढ्यांतच दुसऱ्या हातानें लोकांनां कल्याणाचा मार्ग दाखविणारा जो पुरुष तोच खरा शूर पुरुष होय. एका बाजूस पहावें तों नुसत्या मृत्पिंडांची व जीस कोणत्याहि तऱ्हेची हालचाल नाहीं असली जनता, व दुसरीकडे पहावें तों एका हातांत सुधारणा आणि दुसऱ्या हातांत तरवार धारण करून समाजावर धावून जाणारा सुधारक वर्ग. खरा मार्ग या दोहोंच्या मध्यभागीं आहे.

मी जपानांत असतां मला तेथें एक मौजेची गोष्ट समजली. आपल्या बाहुलीवर अगदीं मनापासून प्रेम केलें ह्मणजे ती जीवंत होते, असा जपानांतील मुलींचा समज आहे. जपानी मुलगी आपल्या बाहुलीस यत्किंचितहि न दुखविण्याची फार काळजी घेत असते. माझासुद्धां असाच समज आहे, कीं, आमच्यांतील संपत्तीच्या योगानें मोठ्या झालेल्या मुलांनीं जर आपल्या लहान भावंडांबद्दल थोडें तरी प्रेम दाखविलें, तर मृतप्राय झालेला हिंदुस्थान अल्प कालांत खडबडून जीवंत होईल. अहाहा! या जीवितांतील सर्व भोगांचा त्याग करून केवळ संन्यस्तवृत्तीनें, क्षणक्षणां खालींखालीं जाणाऱ्या आपल्या बांधवांच्या उद्धारार्थ हात पुढें करणारे योगी व योगिनी, बिचाऱ्या हिंदुस्थाना! तुझ्या कधीं तरी नजरेस पडतील काय? खरी कळकळ आणि खरें प्रेम यांच्या जोरावर दांभिक आणि राक्षसी वृत्तीच्या लोकांचे बेत साफ उलथून पाडतां येतात, असा माझ्या या छोट्याशा जीवितयात्रेंतसुद्धां मला अनुभव आला आहे.

मी पुन्हा युरोपांत जाईन कीं नाहीं तें आज निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. आतां जरी मी गेलों तरी माझा हेतु केवळ मातृभूमीच्या सेवेचाच असेल. अगदीं हिंदु तऱ्हेनें वागून चांडालांच्यासुद्धां घरीं जाऊन त्यांची सेवा करण्यास तयार अशीं कितीतरी स्त्रीपुरुषें आज पाश्चात्य देशांत आहेत. पण इकडे अशी तयारी कितीकांची आहे? आणि ज्यांची असेल त्यांनां कवडीचीसुद्धां मदत नाहीं. माझ्या स्वागतासाठीं जो पैसा लागला त्याच्याकरितां कलकत्त्याच्या लोकांनीं मला एक व्याख्यान द्यावयास लाविलें व त्याला तिकिटें लाविलीं होतीं! आतां याबद्दल त्यांनां दोष देण्याची माझी इच्छा नाहीं; पण मला एवढेंच दाखवावयाचें आहे, कीं, पैसे व माणसें हीं दोन्हीहि बाहेरून आल्याखेरीज आजच्या स्थितींत हिंदुस्थानास दुसरा तरणोपाय नाहीं.

आपला सदैव हितचिंतक,

विवेकानंद.

पत्र १४ वें.

दार्जिलिंग, ता० २४ एप्रिल १८९७.

श्रीमती सरला घोसल, बी. ए. यांस,—

प्रिय भगिनी! सध्याच्या कार्यास आरंभ कसा करावा ह्मणून आपण विचारलें, त्याविषयीं मी माझें मत सांगतों. कार्यास आरंभ करण्यापूर्वीं सिद्धीची कल्पना आपल्या मनांत प्रारंभींच तयार असते. तेव्हां आरंभ करावयाचा तो सिद्धीच्या कल्पना असतील त्या मानानें केला पाहिजे. आपल्या उदार कल्पना, देशभक्ति, कार्यतत्परता वगैरे गुणांबद्दल मुल्लरबाईनीं माझ्यापाशीं आपली फार तारीफ केली व आपल्या विद्वत्तेबद्दल तर आतां माझी स्वतःचीच खात्री झाली आहे. या लहानशा जीवाच्या हातून आजवर देशसेवेचा कोणत्या दिशेनें प्रयत्न झाला आहे हें जाणण्याची जिज्ञासा आपणास झाली, हें मी माझें मोठें सुदैव समजतों, व ही आपली जिज्ञासा या लहानशा पत्रांत तृप्त करण्याचा मी यत्न करणार आहें; पण असें करण्यापूर्वीं या बाबतींत जे माझे विचार माझ्या दृष्टीनें परिपक्क झाले आहेत ते प्रथम सांगतों. ह्मणजे आपणासहि त्यासंबंधीं स्वतः विचार करण्यास ठीक पडेल. आपण अनंत काल गुलाम आहोंत. या माझ्या ह्मणण्याचा अर्थ असा, कीं, भरतभूमींतील जनतेस आपला नैसर्गिक आत्मतेजप्रकाशाचा हक्क बजाविण्यास केव्हांहि अवसर सांपडलेला नाहीं. हा उपभोग आज कित्येक शतकें पाश्चात्यांस मिळत आहे. आमच्याइकडे सर्वकांहीं राजाच्या हुकमानें व्हावयाचें. कोणीं काय खावें, कोणीं काय प्यावें, हेंसुद्धां राजानें ठरवावयाचें. पाश्चात्य देशांत हरएक गोष्ट लोकच ठरवित असतात. आतां सांप्रतच्या राज्यकर्त्यांनीं सामाजिक बाबतींत पूर्ण मौन स्वीकारलेलें आहे, पण लोकच इतके गचाळ झालेले आहेत, कीं, त्यांनां आत्मविश्वास कसा तो मुळींच राहिलेला नाहीं. मग आत्मश्रद्धेची गोष्ट दूरच राहिली. कोणतीहि नवी गोष्ट करावयाची

ह्मणजे पाश्चात्य लोक सभांवर सभा भरवितील, वादविवाद करतील व लोकांनां त्या गोष्टीच्या इष्टानिष्टतेबद्दल जें जें ह्मणून सांगण्यासारखें असेल तें सारें समजावून देतील. हें सारें होऊन लोकांची समजूत पटली, कीं, मग ती गोष्ट आचरणांत यावयास क्षणाचाहि उशीर नाहीं; पण आमच्या इकडे हा कार्यक्रम अगदीं निरर्थक होतो. तुह्मी वाटेल तितका कंठशोष करा, परिणाम पालथ्या घड्यावर पाणी ! तोंडानें मात्र आह्मी अमुक एक संस्था 'सार्वजनिक' आहे असें ह्मणतों, पण 'सर्व जनांचा' समावेश जींत कधींहि झालेला नाहीं, अशीच ती संस्था असते. आमच्या मार्गांतली दुसरी मोठी अडचण ह्मणजे ही, कीं, आमच्यांत निग्रह फारच कमी आहे. नुसत्या वादविवादांतच आमच्या लोकांचें सामर्थ्य खलास होऊन शेवटीं प्रत्यक्ष कार्याच्या वेळीं या मंडळीच्या अंगीं विलक्षण शैथिल्य येत असतें. तसेंच आपणांस हेंहि कळविणें इष्ट वाटतें, कीं, श्रीमंत लोकांवर माझा मुळींच भरंवसा नाहीं.गरीब पण तडफदार व खऱ्या कळकळीच्या तरुणांवर माझा जास्त भरंवसा आहे. या माझ्या तरुण मित्रांवरच सर्व सिस्त ठेवून जें करणें तें स्वस्थपणें पण चिकाटीनें आणि गवगवा न करितां करावें, असें माझें मत आहे.

आतां माझ्या कार्याविषयीं माझे काय विचार आहेत ते सांगतों. पाश्चात्यांची अर्वाचीन सुधारणा व पौर्वात्यांची प्राचीन सुधारणा यांचा जो झगडा आतां सुरू झाला आहे, त्याचें दृश्य स्वरूप सांप्रत सुरू होऊं पाहणारी हिंदुस्थानांतील चळवळ हें होय. शिक्षणाचा प्रसार सामान्य जनसमाजांत होऊं लागला तेव्हां आमच्या या देशांत या चळवळीस दृश्य स्वरूप येऊं लागलें. राष्ट्राची खरी वाट नेहमीं शिक्षणाचा प्रसार ज्या प्रमाणावर बहुजनसमाजांत होतो त्या प्रमाणावरच अवलंबून असते. आजपर्यंत बुद्धीच्या वाढीचीं साधनें मूठभर लोकांनींच आपल्या हातांत ठेविलीं. तेव्हां आपणास आतां जर खरोखर कांहीं कार्यभाग करणें असेल तर तो या बहुजनसमाजांत विद्याप्रसार करणें हाच होय. आज जवळ जवळ अर्धें शतक सुधारणेच्या गप्पांचा बराच सुकाळ झालेला आहे. मीं गेलीं दहा वर्षें हिंदुस्थानाच्या बऱ्याच भागांतून प्रवास केला; त्यांत समाजसुधारक ह्मणविणाऱ्या बऱ्याच संस्था जागोजाग मला आढळल्या. पण अत्यंत कष्टाची गोष्ट ही, कीं,

ज्यांच्या रक्तावर पोसून आज आमच्यांत ' सभ्य गृहस्थ ' निपजत आहेत त्यांच्याकरितां मात्र या ' सभ्य ' गृहस्थांनीं कांहींसुद्धां केलेलें नाहीं !

सांप्रतची स्थिति आह्मांला कां प्राप्त झाली आहे याचा कोणींच विचार करूं नये काय ? थोडक्याशा लाभाकरितांसुद्धां आपल्याच देशबांधवांच्या मानेवर तरवार ठेवण्यास तयार असे लोक हिंदुस्थानाशिवाय इतर कोणत्याहि देशांत सांपडणार नाहींत. आमचें सर्व कलाकौशल्य आह्मांला सोडून गेलें, आमचा कारागीरवर्ग नामशेष झाला. असें कां झालें, याचा शोध लावून मुळापासून सुधारणेस सुरुवात करा. कुशल व नांवाजलेल्या इंग्रज कारागिरावर सांप्रतचा जर्मन कारागीर तोड करूं लागला आहे, तो कां, याचा विचार करा. या सर्वांचें मूळ शिक्षणप्रसारांत आहे. मीं यूरोपांत प्रवास केला त्या वेळीं तिकडील कारागिरांची स्थिति पाहिली, तेव्हां आमच्या कारागीर मंडळीची सांप्रतची अवस्था माझ्या डोळ्यांपुढें उभी राहून माझ्या पोटांत भडभडून आलें. शिक्षणानें आत्मविश्वास व आत्मविश्वासानें खऱ्या स्वातंत्र्याची चाड उत्पन्न झाल्यामुळें वेदान्तसिद्धान्तांप्रमाणें तिकडे जास्त ' ब्राह्मण ' निर्माण होऊं लागले आहेत. आमच्यांतील ब्राह्मण्य दिवसेंदिवस लयास जात आहे. एखादा आयरिश मनुष्य न्यूयॉर्कमध्यें पहिल्यानें येतो तेव्हां पाहावा तर तो अकालीं वृद्ध झालेला, तोंडावर कांहीं रया नाहीं असा, व सतरा ठिकाणीं वांकलेला असतो; पण त्यालाच पुढें सहा महिन्यांनीं पहाल तर तुह्मांला तो ओळखावयालासुद्धां येणार नाहीं ! त्याची नजर गरुडासारखी तेजदार झालेली आढळेल व तो छाती काढून चालतांना दिसेल. असें कां ? हा फरक कशानें झाला ? यावर आमचा वेदान्त पुढील उत्तर देतोः—" बाबारे ! तूं पूर्वी आपल्या देशांत होतास. तेथील हवा अनंत काळच्या गुलामगिरीनें इतकी दूषित झालेली आहे, कीं, तुझ्या मनास उल्हास असा कधींसुद्धां शिवला नाहीं. झाडें, घरें वगैरे निर्जीव वस्तुसुद्धां तुला जगांत जगण्यासारखें कांहीं नाहीं हेंच सांगत होत्या. पण आतां तें मान बदललें. येथें तुला सर्व सृष्टि आनंदमय दिसूं लागली. तुझ्या अंतःकरणांतील आत्मविश्वास मावळला होता तो पुन्हा उदय पावूं लागला व हेंच तुझ्यांतील फरकाचें कारण." आयर्लंडांतील ' शूद्र ' अमेरिकेंत आल्या-

बरोबर ' ब्राह्मण ' झाला. तो अमेरिकेंत आल्याबरोबर सृष्टिदेवता एकदम बोलूं लागली, कीं, **'उत्तिष्ठत ! जाग्रत ! प्राप्य वरान् निबोधत !'**

आतां आमच्याकडील चित्र पहा. सांप्रतचा ' ब्राह्मण ' ह्मणविणारा वर्ग जें शिक्षण हल्लीं घेत आहे तें खरोखर शिक्षणच आहे काय ? पूर्वींची परंपरा मोडून टाकण्यापलीकडे आमचा विद्यार्थिवर्ग जास्त कांहीं करित नाहीं. यामुळें श्रद्धा समूळ नाहींशी झाली आहे. ज्या श्रद्धेमुळें हें अखिल जग चालतें व जिच्या अभावीं सर्वत्र कल्होळ माजेल, त्या श्रद्धेचा असा नायनाट होत आहे. ' **अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति** ' हा तर वेदान्ताचा सिद्धान्तच आहे. आणि यामुळेंच सांप्रत आह्मी नामशेष होण्याच्या मार्गाला लागलों आहों. तर आतां खऱ्या शिक्षणास आरंभ करा. प्रथमतः आत्मसंशोधनाच्या मार्गाला लागा. ह्मणजे जटा वाढवून व दंडकमंडलू घेऊन अरण्यवास पतकरा, असा मात्र माझ्या ह्मणण्याचा भावार्थ समजूं नका. जगांत हरघडी उपयोगास येणारें ज्ञान व या संसृतींतून कायमची मुक्ति मिळविण्यास लागणारें ज्ञान या दोहोंत कांहीं फरक आहे, किंवा हीं एकमेकांस मारक आहेत, असें तुह्मांला वाटूं देऊं नका. वस्तुतः ज्ञान हें एकच. त्याचें निरनिराळ्या उपाधींनीं बाह्य अथवा दृश्य स्वरूप बदलतें, इतकेंच. ज्या ज्ञानानें मुक्ति मिळेल त्याच ज्ञानानें तुमचा संसार सुखाचा होईल हें निश्चयात्मक समजा. संसारांतले अनेक कष्टसुद्धां याच ज्ञानाभावामुळें उद्भवतात. शुद्ध ज्ञानाचा संसारांत उपयोग होतो तेव्हां त्यास सांसारिक ज्ञान अशी संज्ञा मिळते व त्याचाच उपयोग जास्त मोठ्या कार्याकडे अर्थात् मुक्तीकडे केला ह्मणजे त्याला पारमार्थिक ज्ञान ह्मणतात. ज्ञानाशिवाय धर्मसाधनहि लंगडें पडतें, किंबहुना अशक्य होतें. ह्मणून प्रथम संसारांत लागणाऱ्या ज्ञानाचा संग्रह करा, ह्मणजे संसार सुलभ होईल व अल्पसा धर्मसंग्रहि करण्यास सुलभ पडेल. ' **स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्** ' असें भगवंताचें वचन आहे; ह्मणून अल्प जरी धर्मसंग्रह झाला, तरी प्रसंगीं एखाद्या महाभयापासून देखील संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांत आहे, हें विसरूं नका. या जीवात्म्यांत जी अनुपम चैतन्यशक्ति अदृश्य स्थितींत वास करित आहे, तीस जागृत करून ती तेजोमय होईल—स्वयंप्रकाश

होईल असें करावयाचें आहे. अत्यंत क्षुद्र कीटकापासून तों पूर्ण पुरुषापर्यंत सर्वांत हें चैतन्य मूळ एकाच स्वरूपाचें आहे, हा आमचा सिद्धान्त आहे; व जो फरक दिसून येतो त्याचें कारण जागृतीचें कमीअधिक प्रमाण होय. जसजसा अवकाश व संधि जास्त मिळेल, तसतशी जागृति जास्त होऊन मूळ ज्ञानज्योतीवरील पडदा दूर होत होत पूर्णपणें दूर होतो. तेव्हां आतां दारोदार हिंडून आह्मांला ही जागृति प्रथम उत्पन्न करावयाची आहे, व यासाठीं ज्ञानदान करित आह्मांला दारोदार हिंडलें पाहिजे.

आतां तोंडानें ह्या गोष्टी बोलणें फार सोपें आहे, पण त्या प्रत्यक्ष कृतींत उतरावयाच्या कशा? अगदीं सर्व गोष्टींचा परित्याग केलेले असे हजारों बैरागी, संन्याशी वगैरे आज सर्व देशभर फिरत आहेत. ते धर्मज्ञानदानाचें थोडेंबहुत काम करितच असतात. त्यांपैकीं कांहींस हातीं धरून लहानसहान खेड्यांपाड्यांतून वगैरे हिंडून ऐहिक ज्ञानदान करणें फार फायदेशीर होणार आहे. मद्रासेस एक व कलकत्त्यास एक असे दोन मध्यवर्ती मठ सध्या स्थापन झाले आहेत, व आणखीहि कांहीं स्थापन होतीलसें वाटतें. हें ज्ञान प्रथमतः संभाषणरूपानें देण्यास सुरुवात करावी, असें मला वाटतें. स्वतंत्र शाळा सुरू करण्याइतकी स्थिति अद्याप आलेली नाहीं. या कार्यक्रमाचा एकदा नीट जम बसला ह्मणजे कांहीं मोठमोठ्या गांवांतून जरा मोठ्या प्रमाणावर शाळा व कलागृहें स्थापावीं व त्यांतून यांत्रिक शिक्षणाची सोय करावी. याच पद्धतीनें स्त्रियांकरितांहि कांहीं संस्था स्थापन केल्या पाहिजेत.

सर्पदंश झाला ह्मणजे जखमेंतील विष त्याच वेळीं सर्पाकडून ओढविलें तर तें ताबडतोब उतरतें, असा एक समज आहे. त्याच दृष्टीनें आह्मांला या कार्याकरितां लागणारा पैसा पश्चिमेकडून मिळविला पाहिजे. हा पैसा आह्मांला त्यांच्यापासून फुकट नको. त्यांच्याकडे जी धर्मज्ञानाची उणीव आहे ती आह्मी भरून काढण्यास तयार आहों, व त्याच्या मोबदला आह्मांकडे जी उणीव आहे ती त्यांनीं भरून काढावी. अलीकडच्या शास्त्रीय शोधांच्या हल्ल्यांनीं ख्रिस्ती धर्म अगदीं खिळखिळा होऊन गेला आहे, व पाश्चात्यांत अलीकडे इंद्रियसुखप्रवृत्ति वाढत्या प्रमाणांत असल्यामुळें

धर्मबुद्धीचाहि लोप होऊं पहात आहे. यासाठीं आमचें धर्मज्ञान त्यांनां मिळेल तितकें थोडें, अशी स्थिति तिकडे आहे. तेव्हां आतां शत्रूचा किल्ला हस्तगत करून घेऊन धर्मज्ञानदानानें त्यांच्यांतील शत्रुत्व मारून त्यांनां आमचे खरे मित्र करून घेण्याची ही सोन्यासारखी संधि प्राप्त झाली आहे.

पाश्चात्यांत सध्या स्त्रियांची उन्नति एकसारखी वाढत्या प्रमाणावर आहे. सर्व गोष्टींत स्त्रियांचें प्राधान्य मोठें आहे. स्त्रियांच्या शब्दास तिकडे विशेष मान मिळतो. आपल्यासारख्या कांहीं धीट व विद्वान् स्त्रियांनीं वेदान्ताच चांगला अभ्यास करून जर विलायतेची सफर केली, तर तिकडील हजारों स्त्रीपुरुष आर्यधर्माचा स्वीकार करण्यास तयार होतील. आपणांपैकीं फक्त पंडिता रमाबाईच एक तिकडे गेल्या. पाश्चात्य विद्येचें त्यांचें ज्ञान फार कोतें होतें, तरीसुद्धां त्यांनीं तिकडील लोकांस थक्क करून सोडलें. पौर्वात्त्य व पाश्चात्य अशा दोन्ही प्रकारच्या ज्ञानानें मंडित अशी आपल्यासारखी एखादी स्त्री जर तिकडे जाईल, तर ती पाश्चात्य लोकांस हालवून सोडील. मैत्रेयी, खना, लीलावती, सावित्री व उभयभारती अशा श्रेष्ठ स्त्रिया ज्या देशांत निर्माण झाल्या, त्याच आमच्या भारतमातेच्या उदरीं असलीं स्त्रीरत्नें उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आतां राहिलें नाहीं काय ? ईश्वराची काय मर्जी असेल ती खरी ! आह्मी या प्रयत्नांत इंग्लंड खास सर करूं. आह्मीं हेंच कार्य प्रथम सिद्धीस नेल्याशिवाय आमच्या पायांतील शृंखला तुटण्याचा मार्ग मला तरी दुसरा दिसत नाहीं. नुसत्या फुसक्या सभा भरवून आणि ठराव पास करून केलेल्या स्वातंत्र्याच्या वल्गना वृथा होत. आमच्या राज्यकर्त्यांत लुप्तप्राय झालेल्या दैवी संपत्तीची ह्मणजे सात्विक गुणांची जोड त्यांनां आह्मी करून दिली पाहिजे. मी तर एक गरीब दुबळा यति आहें. मी त्यागी आहें. मी अशरण आहें. मला कोणाचीहि मदत नाहीं. आपणास परमेश्वरकृपेनें आज सर्व गोष्टींची अनुकूलता आहे. आपणापाशीं संपत्ति आहे व सरस्वतीहि आहे. तसेंच असाधारण बुद्धिमत्ताहि आहे. एवढी जय्यत तयारी असून आपण सध्याची संधि व्यर्थ घालविणार काय ? इंग्लंड व अमेरिका या देशांवर विजय, हाच मंत्र सध्या आपण जपला पाहिजे, व हाच एक आमचा तारक मंत्र आहे. एकसारखी अविरत वाढ होत जाणें ही जीवंतपणाची प्रत्यक्ष खूण

आहे. आपण आपल्या ज्ञानाच्या जोरावर साऱ्या जगतीतलावर पसरूं शकूं. ही काया आतांच क्षीण होऊं लागली आहे. तीस आतांच एका भयंकर व्याधीनेंहि ग्रासलें आहे. तथापि मला आशेला अद्यापि एक जागा आहे. माझ्याशीं समानधर्म असा कोणी तरी निपजेल. कारण, काल अनंत आहे व पृथ्वीहि विपुल आहे, हीच माझ्या आशेची जागा.

आतां खाण्यापिण्याच्या निर्बंधांबद्दल माझे विचार मी आपणांस कळवितों. पूज्यपाद श्रीरामकृष्ण हे पूर्वीं कधीं मांसास शिवत देखील नसत; पण नंतर देवीच्या नांवानें त्यांनां तसले पदार्थ कोणीं भक्तिपूर्वक दिले, तर ते गृहण करीत. हत्या करणें हें पाप तर खरेंच, पण आमच्या देहाची रचना जर मांसत्यागास प्रतिकूल असेल, तर मांसाहारावांचून आमचें चालेल, या ह्मणण्यांत मला अर्थ दिसत नाहीं. जगांत जर आह्मांला जगावयाचें आहे तर राजस गुणांचीहि वाढ आह्मीं केली पाहिजे. पण ती मांसाहाराशिवाय कशी होणार? अशोक राजानें कायदा करून लक्षावधि जीव वांचविले हें खरें; पण त्याबरोबरच हजारों वर्षें चालत आलेल्या दुसऱ्या प्रकारच्या यातनांच्या उत्पत्तीचीहि त्याच वेळीं सोय झाली नाहीं काय? कांहीं बकऱ्यांच्या हत्येमुळें पदरीं येणारें पातक व स्वतःच्या अंगांत कुवत नसल्यामुळें प्रसंगीं स्वतःच्या बायकोचीहि अब्रु रक्षण करतां येऊं नये अथवा पोटच्या पोरांच्या तोंडांतला घांस दुसरा जबरीनें उडवून नेत असतां त्याला प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य नसावें ही स्थिति, या दोहोंपैकीं आपणास काय पसंत पडतें? यांत आतां कोणतें पातक कोणत्याहून मोठें आहे? फारच झालें तर ज्यांनां सात्विक गुणांची वाढ आवश्यक आहे, अशा वरच्या जातींपैकीं कांहींनीं मांस खाऊं नये ह्मणजे झालें. पण मांसाशन करूं नये अशी जबरदस्ती एकसहा सुरू करणें, ह्मणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या नाशास आपण होऊन बोलावणें पाठविण्यासारखें आहे. ती सर्व शक्तिमान् विश्वेश्वरी आपणास सुबुद्धि देवो.

विवेकानंद.

पत्र १५ वें.

आल्मोरा, ता० १ जून, १८९७.

प्रियबंधु—

आपण आपल्या पत्रांत वैदिक धर्मासंबंधानें कांहीं आक्षेप घेतले आहेत; पण वेद या शब्दानें केवळ संहितांचाच बोध होतो, असें आपलें मत असेल तर आपले आक्षेप बरोबर आहेत. पण 'वेद' शब्दानें संहिता, ब्राह्मणें आणि उपनिषदें या तीन भागांचा निर्देश होतो, असें आज कित्येक शतकें आह्मी मानित आलों आहों. या तीन भागांपैकीं पहिल्या दोहोंत मुख्यत्वें-करून 'धर्मजिज्ञासा' ह्मणजे यज्ञयागादि कर्मकांडाचा विचार केला आहे, व तिसरा भाग ह्मणजे उपनिषदें यांत 'ब्रह्मजिज्ञासा' ह्मणजे तात्विक ब्रह्मविद्येचा—ज्ञानकांडाचा विचार सांगितला आहे. यज्ञयागादिकांचा त्याग आज कित्येक वर्षें आह्मीं केला आहे, व त्यानंतर झालेल्या सर्व तत्त्ववेत्त्यांनीं फक्त उपनिषत्प्रणीत धर्मतत्त्वें आधारभूत घेऊन पुढील इमारत रचिली आहे. संहिता एवढेच काय ते वेद, असें मत अलीकडे स्वामी दयानंदसरस्वति यांनीं प्रतिपादन केलें आहे, पण तें जुन्या धर्माभिमान्यांनां मान्य झालेलें नाहीं.

संहितांचा सर्व अर्थ निराळ्या पद्धतीनें लावून सर्व हिंदुस्थानास योग्य असा संशोधित हिंदुधर्म निर्माण करतां येईल, असा स्वामीजींचा समज झाला असावासें वाटतें. तथापि सध्याच्या कोणत्याहि अडचणींचा परिहार न होतां त्या तशाच राहिल्या, तेव्हां स्वामीजींनीं दुसऱ्या भागाचा ह्मणजे ब्राह्मणांचा आश्रय केला; पण शक्य ती सारी खटपट करून व साऱ्या कोशांचें पाठबळ घेऊनहि अडचणी आजमितीस पूर्वींप्रमाणें कायम त्या कायमच. फक्त संहिताच तेवढ्या मूलभूत धरून जर विश्वव्यापी धर्म निर्माण करणें एकपट सुलभ असेल तर मी खास सांगतों, कीं, उपनिषदांत प्रतिपादिलेली

तत्त्वें आधारास घेऊन तें काम करणें शंभरपट जास्त सुलभ आहे. दुसरें असें, कीं, अशा कामास आज आपणास साऱ्या हिंदुजातीचें पाठबळ मिळेल व त्यांतच प्राचीन आचार्यांचीहि मदत तुह्मांला होईल.

सांप्रत गीता हीच हिंदुधर्माचें सर्वस्व होऊन बसली आहे असें आपण ह्मणतां तें खरें आहे, व त्या ग्रंथाची योग्यताहि तशीच आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. तथापि भगवान् श्रीकृष्णांच्या स्वतःच्या खऱ्या चारित्र्याभोंवतीं भाकडकथांचें रान एवढें माजलें आहे, कीं, त्यामुळें त्यांनीं सांगितलेल्या सुंदर तत्त्वांचें अनुवर्तन त्यांनींच स्वतः व्यवहारांत कसें केलें याचा पत्ता सांपडणें मोठें मुष्किलीचें झालें आहे. सध्याची वेळ अशी आहे, कीं, वेदान्ततत्त्वांचें व्यावहार्य स्वरूप सिद्ध केल्याशिवाय कोणीसुद्धां तीं ग्रहण करणार नाहींत. असो.

वर लिहिलेल्या मजकुरांत आपणास विचार करण्यासारखें कांहीं नवीन सांपडेल, असा भरंवसा आहे.

आपला हितेच्छु,

विवेकानंद.

पत्र १६ वें.

मु. आल्मोरा, ता. ३ जुलई, १८९७.

ॐनमो भगवते रामकृष्णाय ।

ज्यांच्या इच्छामात्रेंकरून सर्व विश्व चालत आहे त्या ब्रह्मीभूत भगवान् श्रीरामकृष्णांच्या पदकमलांस शतशः प्रणाम.

शतायुर्भव. कोणास काम करावयास नको असलें ह्मणजे त्यानें पाहिजे तर नशिबाकडे बोट दाखवून स्वस्थ बसावें. पण ज्याला काम करावयाचें आहे, तो असल्या गौणमताचा कधींहि स्वीकार न करतां नेहमीं उद्योगाचीच कांस धरील. अशुद्ध अथवा अपरिपक्क ज्ञानामुळें जो कल्पनांचा घोटाळा उडतो त्यांत प्रयत्नवादी व प्रारब्धवादी यांच्या तंट्याचें मूळ आहे. तूं शुद्ध ज्ञानाच्या पाठीस लागून अगदीं उच्च शिखरावर आरूढ हो, ह्मणजे तुला असल्या कल्पनांची बाधा होणार नाहीं.

कष्टमय स्थिति हेंच खऱ्या ज्ञानाची कसोटी लागण्याचें साधन होय, व अशाच स्थितींत वैराग्य प्राप्त होत असतें, असें ह्मटलें आहे. तथापि वैराग्य आणि वैताग यांतील अंतर लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. ज्यांनां खरें वैराग्य प्राप्त झालें असेल, ते धन्य होत. कारण, या वृत्तीचें अंतिम पर्यवसान मुक्तींतच होणार. तुझ्या सध्याच्या मनःस्थितींत 'जरा थांब, वाट पहा' एवढेंच मला सांगतां येण्यासारखें आहे. आतां माझें हें सांगणें तुला आवडणार नाहीं, पण त्याला उपाय नाहीं. आणखी जास्त कांहीं सांगणें मला विहित वाटत नाहीं. फार वल्हविल्यामुळें जसा थोडा थकवा येतो, तशी सध्या तुझी स्थिति झाली आहे. फार थकवा आल्यामुळें वल्हें जरी थांबविलें, तरी अंगांत भरलेल्या पूर्वीच्या वेगाच्या जोरावर नौका हळुहळू परतीर गांठते. तसें आतां तूं मनास जराशी विश्रांति दिलीस ह्मणजे कांहीं वेळानें तें जरा स्थितीवर येईल. मग सध्याची स्थिति वैराग्याची कीं वैतागाची

याचें निराकरण तुझें तुलाच करतां येईल. जर ती वैतागाची असेल, तर कोणींहि शहाणा पुरुष तिच्यासाठीं खटपट करणार नाहीं. वैतागानें मोक्षाची इच्छा ह्मणजे मृगजलानें तहान भागवूं पहाण्यासारखें आहे. परमात्म्याखेरीज दुसऱ्या कशाचेंहि चिंतन न करणें, ह्मणजेच वैराग्य होय.

सर्व विश्वाचा शास्ता कोठें एकाच ठिकाणीं असेल असें संभवत नाहीं, व ज्याला खरें वैराग्य प्राप्त झालें आहे तो मनुष्य असें कधींहि ह्मणणार नाहीं. जीवात्मा व परमात्मा यांतील ऐक्य व भेद कशांत आहे, हें त्याला समजत असतें. जीव व शिव यांचें वस्तुतः ऐक्य आहे ह्मणून सर्व जीवांची सेवा करणें ह्मणजे समुच्चयेंकरून परमात्म्याविषयीं प्रेम धारण करणें, असेंच झालें नाहीं काय ? आपण एखाद्या जीवाची, तो परमात्मस्वरूप आहे हें न ओळखून सेवा केली तर आपल्या मनांत उत्पन्न झालेल्या भावनेस दया अशी संज्ञा प्राप्त होते. दयेनें प्रेरित होऊन आपण हलक्या जीवांचीसुद्धां सेवा करतों. त्या वेळीं आपण त्या जीवांपेक्षां मोठे आहों ही अहंकाराची भावना व्यक्त असते; पण हाच अहंकार समूळ उपटला गेल्यानंतर अर्थात् हेच हलके जीव आत्मस्वरूप ह्मणजे आपल्याच बरोबरीचे दिसूं लागल्यानंतर दयेचें प्रेमांत रूपांतर होतें. याचसाठीं सर्व साधुसंतांनीं दयेचा सांठा हृदयांत वाढविण्यासाठीं नाना प्रकारांनीं उपदेश केला आहे. या प्रेमाचें पर्यवसान जीव व शिव यांच्या ऐक्यांत होतें, अशी श्रुति, स्मृति व प्रत्यक्ष अनुभवहि आहे. ह्मणूनच भगवान् चैतन्यांनीं "प्रेम ईश्वरे। दया जीवे॥" असें जें ह्मटलें तें बरोबर आहे. पण चैतन्य द्वैतवादी असल्यामुळें या दोहोंचें ऐक्य ते प्रतिपादित नाहींत. यासाठीं दयेचें पर्यवसान प्रेमांत होईल, अशी आह्मां अद्वैतवाद्यांची सदैव खटपट असली पाहिजे.

सर्व जीवांवर दया करावी, हें ह्मणणेंसुद्धां माझ्या दृष्टीनें अंमळ चमत्कारिकच वाटतें. 'दया' या शब्दांत अहंकाराची जी सूक्ष्म छटा आहे, ती मला पसंत नाहीं. यापेक्षां सर्व जीव सेव्य व आपण त्यांचे सेवक, अशीच भावना प्रथम धरून तेथून विश्वव्यापी प्रेमावर उडी मारावी, हें मला जास्त श्रेयस्कर वाटतें.

हे शर्मन् ! ज्या वैराग्यानें सर्व दृश्य विषम स्थिति सम होतात, संसार-दुःखाचें निवारण होतें, या दृश्य जगांतील त्रिविध ताप दूर होतात, दिशाभूल नाहींशी होते, मायातिमिराचा नाश होऊन ज्ञानसूर्याची शुद्ध प्रभा फांकते, व तृणापासून ब्रह्मापर्यंत सर्व पदार्थ एकरूप आहेत असा अनुभव येतो, तें खरें वैराग्य तुला प्राप्त व्हावें, हीच इच्छा सदैव धारण करणारा,

विवेकानंद.

पत्र १७ वें.

देवगड-वैद्यनाथ, ता० ३ जानेवारी, १८९८.

(एका बंगाली स्त्रीस लिहिलेलें पत्र.)

प्रिय मातुश्री—

आपल्या पत्रांत बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टींसंबंधीं आपण उल्लेख केला आहे. त्या सर्व गोष्टींसंबंधीं सविस्तर उत्तर या लहानशा पत्रांत देणें शक्य नाहीं. तथापि माझें ह्मणणें थोडक्यांत सांगण्याचा मी प्रयत्न करतों.

(१) एखादा ऋषि, मुनि अथवा प्रत्यक्ष परमेश्वर जरी झाला तरी त्याला कोणत्याहि चालीरीति समाजावर लादतां येणें शक्य नाहीं. एखादी बिकट परिस्थिति प्राप्त झाली ह्मणजे तिच्या निवारणार्थ समाजच आपण होऊन नव्या चाली निर्माण करित असतो. या गोष्टीस आत्मसंरक्षणाविषयींची जी प्राण्यांची उपजत बुद्धि तीच मूळ कारण असते. यानंतर अशा रूढ झालेल्या चाली प्राचीन ऋषींनीं भावी पिढ्यांच्या उपयोगाकरितां लिहून ठेविल्या. एखाद्या विशिष्ट संकटाच्या निवारणाकरितां एखादा मनुष्य एखाद्या अनिष्ट गोष्टीसहि आपल्या वागणुकींत अवकाश देतो; पण तें संकट निवारण झाल्यानंतरहि जर केवळ चाल ह्मणून त्याच मार्गास तो सदैव अनुसरेल तर प्रसंगीं त्याचें मोठें नुकसान झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

उदाहरणार्थ, आपण पुनर्विवाहप्रतिबंधाचीच चाल घेऊं. ही चाल कोणत्याहि ऋषीनें अथवा एखाद्या दुष्ट मनुष्यानें समाजावर लादलेली नाहीं. स्त्रियांस सदैव दास्यांत ठेवावें अशी पुरुषांची इच्छा कितीहि प्रबळ असली, तरी त्यांच्या इच्छेस अनुकूल अशी परिस्थिति नसेल तर त्यांची इच्छा जागच्याजागीं दडपून ठेवणें त्यांस भाग पडेल. वरील प्रतिबंधाच्या बाबतींत दोन मुद्दे लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. (१) खालच्या वर्गांत पुनर्लग्नें होतात. (२) उच्च वर्गांत पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या जास्त आहे.

प्रत्येक मुलीचें लग्न झालेंच पाहिजे असा सामान्य नियम आहे, तो लक्ष्यांत घेतला ह्मणजे या कमीजास्ती संख्येमुळें अगोदर मुलीचें पहिलेंच लग्न होण्यासंबंधीं अडथळे वाढत जाण्याचा संभव दिसतो. मग एका स्त्रीस दोनतीन नवरे करण्याची संधि मिळावी कशी? यामुळें एक वेळ लग्न झालें, कीं, पुन्हा त्या स्त्रीचें लग्न होऊं नये असा, निर्बंध समाजानें केला. कारण, तसें झालें नसतें तर पुष्कळ कुमारिकांस मुळींच लग्नावांचून राहणें भाग पडलें असतें. उलटपक्षीं, खालच्या जातींत पुरुषांची संख्या जास्त असल्यामुळें पुनर्विवाहाची चाल रूढ होण्यास अडथळा झाला नाहीं. पाश्चात्त्य देशांतहि या चालीमुळें पुष्कळ मुलींस जन्मभर अविवाहित स्थितींत राहण्याचा प्रसंग येतो.

यावरूनच जातिभेदादि चालींचें रहस्य आपल्या लक्ष्यांत येणें फारसें अवघड नाहीं. तेव्हां कोणतीहि चाल अनिष्ट वाटली तर तिच्या अनिष्टपणाचें क्षेत्र लोकांच्या ध्यानांत आणून देण्याचा प्रथम यत्न केला पाहिजे. ह्मणजे लोकच ती चाल आपोआप सोडून देतील. एखाद्या चालीविरुद्ध बोटें मोडून अथवा लोकांस शिव्याशाप देऊन फायदा नाहीं.

मुख्य प्रश्न असा आहे, कीं, समाज या नांवाखालीं जी मनुष्यांची घटना होत असते त्यानें मनुष्यजातीचें कांहीं कल्याण होत असतें कीं नाहीं? व हा संघ अथवा समाज एकत्र रहावा, त्यांत फाटाफूट होऊं नये ह्मणून जे नियम अमलांत येतात ते प्रत्येकास पाळायास लावणें इष्ट आहे कीं नाहीं? वरील प्रश्नांस बहुधा 'होय' असेंच उत्तर येईल. तथापि कोणी असेंहि ह्मणेल, कीं, जर अशा संघांतील अथवा समाजांतील कांहीं विशिष्ट व्यक्ति आपल्या बुद्धीच्या बळानें अथवा दुसऱ्या कांहीं युक्तिप्रयुक्तीनें समाजांतील इतर लोकांचें स्वातंत्र्य हरण करतील तर त्यास काय उपाय आहे? पण यावर मी एक असा उलट प्रश्न विचारतों, कीं, अज्ञानी लोकांच्या हातांत सत्ता अगर स्वातंत्र्य देऊं नये ह्मणून जी ओरड एका दिशेकडून ऐकूं येते, तिचा अर्थ काय? आणि स्वातंत्र्य या शब्दाची तरी व्याख्या काय? असें समजा, कीं, तुह्मांला व मला उद्यां आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांची घरें लुटण्याची परवानगी मिळाली,

तर आपणांस स्वातंत्र्य मिळालें असें तुह्मीं अगर मीं ह्मणणें शोभेल काय? मला वाटतें, कीं, स्वातंत्र्य शब्दाचा असा अर्थ करण्याची फारशी कोणास इच्छा होणार नाहीं. दुसऱ्याच्या सुखाच्या आड न येतां मीं आपल्या कायेचा, मनाचा व संपत्तीचा वाटेल तसा उपयोग आत्मसुखार्थ करावा, इतकाच स्वातंत्र्य या शब्दाचा वास्तविक अर्थ आहे. तसेंच समाजांतील प्रत्येक व्यक्तीस आपल्या सुखाचीं साधनें वाढविण्यास योग्य सवड व संधि मिळावी, हेंहि उचित आहे. माझ्या मतें स्वातंत्र्य या शब्दांत वरील विचारांचा अंतर्भाव होतो. अज्ञ लोकांच्या हातांत सत्ता अगर स्वातंत्र्य देऊं नये, असें ह्मणणारा एक पक्ष अस्तित्वांत असल्याचें वर सांगितलें आहे. यांच्या ह्मणण्याचा मथितार्थ असा आहे, कीं, अशा लोकांस जर त्यांच्या बुद्धिमत्तेचा पाहिजे तेवढा फायदा घेण्यास पिढ्यानपिढ्या संधि मिळाली तर ते उद्यां आह्मांस डोईजड होऊन सर्व समाजघटना पालथी होईल. सर्वच जर शिकून मोठे होऊं लागले, तर हलकीं कामें कोणीं करावीं हें ह्मणणें निवळ स्वार्थबुद्धीचें द्योतक आहे, कीं, समाजघटनेच्या खऱ्या काळजीनें उत्पन्न झालें आहे, तें तुह्मींच ठरवा. मी विलायतेंत असतांना तिकडेहि हीच ओरड सुरू झाल्याचें माझ्या कर्णपथावर आलें आहे. थोड्याशा लक्ष्मीपुत्रांच्या इंद्रियसुखलालसा तृप्त व्हाव्या ह्मणून कोट्यवधि स्त्रीपुरुषांनीं अज्ञानपंकांत खुशाल लोळत पडावें, ही नुसती कल्पनाहि मला किळसवाणी वाटते! वरच्या वर्गांतले थोडेसे लोक याचें नांव समाज कीं, लक्षावधि लोकांचा ज्यांत समावेश होतो तो समाज?

'**उद्धरेदात्मनात्मानम्।**' ज्याचा त्यानें उद्धार करून घेतला पाहिजे, हें खरें; पण एखादा मनुष्य आत्मोन्नतीकरितां खटपट करित असल्यास त्याला आपल्या हातून होईल तें साहाय्य केलें पाहिजे. तें होत नसेल तर त्याच्या मार्गांत नसते अडथळे तरी आणूं नयेत. आणि असे अडथळे उत्पन्न झाले असतील तर ते नाहींसे करणें हें समाजांतील प्रत्येक व्यक्तीचें आद्य कर्तव्य आहे.

आपण मानवी इच्छाशक्तीसंबंधीं प्रश्न विचारिला तोहि महत्त्वाचा आहे. या विषयाबद्दल प्रत्येकानें थोडी फार माहिती करून घेणें अवश्य आहे. वासनेचा क्षय करणें आवश्यक आहे असा सर्व धर्मांचा सिद्धांत आहे. वासनांचा क्षय ह्मणजे इच्छाशक्तीचाहि क्षयच होय. कारण, वासना ह्मणजे इच्छाशक्तीचें एक विशिष्ट स्वरूपच आहे. दृश्य जगाची उत्पत्ति होण्यासहि मूळ कारण वासनाच आहे. वाईट वासनांचा त्याग व चांगल्यांची वाढ करावी असें कित्येक धर्मप्रवर्तकांनीं ह्मटलें आहे; पण शहाण्या मनुष्याचें या मतानें समाधान होणार नाहीं. बौद्ध धर्माचें प्रतिपादन असें आहे, कीं, वासनांमुळेंच जगांतील सर्व दुःखांचा उगम होतो, तेव्हां सर्व वासना मेल्या पाहिजेत; पण या मताचा अनुवाद येथ-पर्यंत लांबला आहे, कीं, वासनाक्षयाबरोबरच स्वतःचाहि क्षय करावा, असें त्यांनीं ‘ निर्वाण ’ या शब्दानें सुचविलें आहे. एखाद्या मनुष्याच्या मानेवर बसलेल्या चिलटास मारण्याकरितां त्याजवर जोरानें तरवारीचा वार करावा, तसेंच हें आहे.

वासनांमुळें दृश्यावस्थेंत आलेला जीवात्मा हा निर्वासनास्थितींतील परमात्म्याचाच सूक्ष्म अंश आहे. वासनाक्षय झाला ह्मणजे निर्वासना-स्थितींतील परमात्म्याशीं जीवात्म्याचें ऐक्य होतें. ही स्थिति कल्पनेनें जाणतां येण्याजोगी नाहीं, अगर वाणीनें सांगतां येण्याजोगीहि नाहीं. ह्मणूनच ‘ **यतो वाचो निवर्तते अप्राप्यमनसासह** ’ असे या स्थिती-बद्दल उद्गार काढावे लागले. हीसच मुक्ति ह्मणतात. पाहिजे तर निर्वाण असेंहि नांव तीस द्या. नांवांत मोठेंसें महत्त्व नाहीं.

या वासनांचा क्षय करण्याकरितां गुरुमूर्तीचें ध्यान हा फार चांगला उपाय आहे. तेथें मन स्थिर करणें फार कठीण काम आहे. कारण, मनुष्यालाच परमेश्वर मानणें फार जड वाटतें; पण अभ्यासानें सर्व मार्ग सुलभ होतात. प्रत्येक मनुष्य ईश्वरांशच आहे. ज्यांस हें अनुभवानें पटलेलें असतें ते गुरु ह्मणवितात व ज्यांस याचा अनुभव आलेला नसतो

ते सामान्य जन होत. गुरूला गुरुपण देणें हेंहि शिष्याच्या हातीं आहे. शिष्य उत्तम असला ह्मणजे गुरूलाहि त्याला मदत करण्याचें आपलें काम बजाविण्याकरितां योग्य खटपट करणें भागच पडतें. तुमचें कोणावरहि मनापासून प्रेम जडलें तर तो दुसरा मनुष्यहि आपोआप तुह्मावर प्रेम करूं लागतो, तद्वत्‌च हें आहे.

विवेकानंद.

पत्र १८ वें.

देवगड—वैद्यनाथ, ता० २३ डिसेंबर, १९००.

(एका बंगाली स्त्रीस लिहिलेलें पत्र.)

प्रियमातुश्री—

आपलें पत्र पाहून फार आनंद झाला. आपण प्रदर्शित केलेले विचार ठीक आहेत. अनिर्वचनीय प्रेम हेंच ईश्वराचें स्वरूप आहे. '**स ईश अनिर्वचनीयप्रेमस्वरूपः**' असें नारदमुनींनीं त्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे, व आजपर्यंत सर्वत्र अनुभवहि तसाच आहे.

कोणत्याहि समूहास वेदांताचा पारिभाषिक शब्द समष्टि असा आहे व त्यांतील प्रत्येक घटकास व्यष्टि असें त्या भाषेंत ह्मणतात. जसें मी, तुह्मी अथवा तिसरा एखादा मनुष्य हे प्रत्येक व्यष्टि होत, व समाज हा समष्टि होय. मी, तुह्मी, पक्षी, कीटक, झाड, तारा, चंद्र, सूर्य हे प्रत्येकीं व्यष्टि होत व विश्व हें समष्टि होय. या समष्टिरूपासच वेदांतांत विराट्, हिरण्यगर्भ अथवा ईश्वर असेंहि ह्मटलेलें आहे. ब्रह्मा, विष्णु, देवी वगैरे पौराणिक देवताहि याच स्वरूपाचीं भिन्न नांवें आहेत.

प्रत्येक व्यष्टीस स्वातंत्र्य आहे किंवा नाहीं, तिचे निसर्गसिद्ध हक्कांचें स्वरूप काय, वगैरे प्रश्न समाजसंस्थास्थापनापासून प्रत्येक समाजांत चर्चेचे विषय होऊन बसले आहेत, व त्यांचें समाधानकारक उत्तर मिळविण्यासाठीं समाज प्रयत्न करित आहे. पाश्चात्य देशांतहि हा वादविवाद मोठ्या जोरानें चालू आहे. समष्टीच्या हिताकरितां व्यष्टीनें आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्याचा यज्ञ करणें, ह्या तत्वाला 'सोशियालिझम' ह्मणतात, व याच्या उलट व्यष्टीच्या हक्कांचें प्रतिपादन करणें याला 'इंडिव्हिजुआलिझम' असें ह्मणतात.

समष्टीच्या कल्याणाकरितां ह्मणून व्यष्टीचे सारे वैयक्तिक हक्क समूळ बुडवून अथवा नियमांनीं कायमचे जखडून टाकल्याचे परिणाम काय

होतात, याचें आमचा सांप्रतचा समाज हें उत्तम उदाहरण आहे. आमच्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या मागें जन्मापासूनच शास्त्र हात धुऊन पाठीस लागतें. त्यानें जन्मावें शास्त्राप्रमाणें. खाणें पिणें, निजणें, बसणें, उठणें अथवा हजामत करविणें तीसुद्धां सशास्त्र झाली पाहिजे! एवढेंच नव्हे तर त्याला मरणें असेल तेव्हां त्यानें शास्त्राधाराप्रमाणेंच मेलें पाहिजे. आतां यांत एक हित आहे. पण त्याकरितां दुसरें केवढें नुकसान सोसावें लागत आहे याचा विचार करा. यांत हित येवढेंच आहे, कीं, यामुळें प्रत्येक पोटसमाजांत निरनिराळ्या धंद्यांची वांटणी होऊन पिढ्यानपिढ्या एकच धंदा करित असल्यामुळें साऱ्या जगांत कुशल असे कारागिर निपजूं शकतात. एक रुपया किंमतीच्या मागावर वीस रुपये वार किंमतीचा किनखाब विणणारा कारागिर हिंदुस्थानाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि देशांत सांपडणार नाहीं. फार काय सांगावें, पण तीन धोंड्यांच्या चुलीवर मुठभर काटक्यांत जी सुंदर पाकनिष्पत्ति आमचा आचारी करील ती दोन दोन आंकड्यांचा पगार खाणाऱ्या विलायती आचाऱ्यास करतां येणें शक्य नाहीं.

एखाद्या कुरूप व भांडकुदळ बायकोबरोबरसुद्धां सारा जन्म काढणारा नवरा अथवा दुराचारी, बेमुर्वत व पशुतुल्य नवऱ्याबरोबर भांडणतंटा न करितां सारें आयुष्य घालविणारी स्त्री हींसुद्धां हिंदुस्थानाशिवाय इतर देशांत आढळणार नाहींत.

येथपर्यंत एका बाजूचा विचार झाला; पण दुसरा परिणाम असा झाला आहे, कीं, वैयक्तिक हक्क बुडतां बुडतां ते इतके साफ बुडाले, कीं, त्याबरोबरच प्रत्येक व्यक्तीच्या **स्वत्वास**हि कायमचा समाधि मिळाला. सर्व गोष्टी केवळ यांत्रिक रीतीनें होत असतात. त्यांत व्यक्तीच्या स्वतंत्र कर्तबगारीस वाव असा कोठेंहि नाहीं; त्यामुळें सर्वत्र निराशेचें साम्राज्य पसरलें आहे. यामुळें सुखें जशीं भासेनाशीं झालीं तसेंच दुःखांचेंहि जें मनास चलन देणारें सामर्थ्य तेंहि नष्ट झालें आहे. एखाद्या मोठ्या दुःखाचा जाज्वल्यपणाहि भासेनासा झाला ह्मणजे तन्निवारणार्थ खटपट तरी कशास हवी? आपल्या सध्याच्या स्थितीपेक्षां जास्त इष्ट अशी स्थिति शक्य तरी आहे कीं नाहीं, याचाहि आह्मांस विसर पडला. किंबहुना, स्वर्गसुख

तें याच स्थितींत आहे, असेंहि आम्हांला वाटूं लागलें. ज्या कोणाला ही अनिष्ट स्थिति दिसूं लागली असेल तो तीविरुद्ध फारसा प्रयत्न करीत नाहीं. प्रयत्न करूं लागल्यास त्याला पाठबळ नसावयाचें. तेंहि मिळालें तर कोणाच्या थोड्याशा भेडसावण्याबरोबर या बुवांचे हातपाय लटपटतात. एवंच परिणाम शून्य.

केवळ नियमबद्ध चालणें, शास्त्राची रेषा केव्हांहि उल्लंघन न करणें, हेंच जर पुण्यकारक म्हटलें तर एखाद्या झाडापेक्षां जास्त गुणवान् आणि आगगाडीपेक्षां जास्त पुण्यवान् असा एक तरी प्राणी मला दाखवा बरें! सृष्टीचा कायदा उल्लंघन केलेला असा एकहि धोंडा अस्तित्वांत नाहीं. जनावरांत कधीं पापी जनावर तुमच्या पाहण्यांत आलें आहे काय ?

एखादी प्रचंड आगबोट अथवा लांबचलांब आगगाडी बिनधोकपणें इकडून तिकडे संचार करित असते. कारण त्यांस बुद्धि व ज्ञान नसल्यामुळें भयाचेंहि ज्ञान त्यांस नाहीं. कायद्याचें उल्लंघनहि त्यांजकडून होत नाहीं. पण तेंच एखाद्या क्षुद्र कीटकाचें उदाहरण घ्या. आत्मसंरक्षणाकरितां तो सृष्टीचा कायदाहि मोडण्याचा प्रयत्न करतांना आढळतो. आतां त्याला अशा कृत्यांत यश येईल कीं नाहीं, हा प्रश्न निराळा. पण तो प्रयत्न करील हें निश्चित आहे. ज्या ज्या मानानें असे सुखाचे प्रयत्न प्रत्यक्ष सृष्टींत सिद्ध होतात, त्या मानानें जीवात्म्याची थोरवी अधिक वाढते. अशा रीतीनें प्रत्येक प्रयत्न यशस्वी करण्याचें ज्या जीवास सामर्थ्य असतें तोच ईश्वर ही पदवी पावतो. त्याची इच्छाशक्तिच अशी प्रबळ असते, कीं नुसती इच्छा आणि तिची तृप्ति हीं बहुधा बरोबरच घडून येतात. मध्यंतरींच्या प्रयत्नांची त्या ठिकाणीं अपेक्षा नसते.

शिक्षण हा फार व्यापक अर्थाचा शब्द आहे. विस्तृत वाचनानें ज्ञानदर्शक शब्दांचा मोठा संग्रह डोक्यांत करणें म्हणजे शिक्षण नव्हे. कारण, यारीतीनें एखादा मोठा कोशहि सुशिक्षित म्हणतां येईल. तसेंच पुष्कळ प्रकारच्या विषयांवर मत देतां येणें हेंहि सुशिक्षिताचें लक्षण नव्हे. आपल्या इच्छाशक्तीचा निग्रह करून योग्य मार्गास तीस लावणें व प्रत्यक्ष फलदायी करणें हें ज्या वाचनानें, मननानें अथवा वर्तणुकीनें साध्य होईल त्यास

शिक्षण असें ह्मणावें. तर मग ज्या शिक्षणानें इच्छाशक्ति जागृत न होतां तीस निद्रारोग जडून ती मृत्युपंथास लागते, त्याला शिक्षण असें नांव देतां येईल काय ? मी तर असें ह्मणतों, कीं, मनुष्याच्या बुद्धिवर्धनास पूर्ण अवकाश व मोकळीक मिळाली असतां त्याच्या वर्तणुकींत कांहीं वेळ प्रमादहि घडतील; पण असे प्रमादहि नुसत्या यांत्रिक पद्धतीनें झालेल्या शुद्ध वागणुकीपेक्षां जास्त श्रेयस्कर होतील, असें मला वाटतें. हें खरें असेल तर असल्या निर्जीव मृत्पिंडांच्या बनलेल्या समाजास सृष्टींत काय महत्त्व आहे? या शृंखला जर नसत्या तर सर्व राष्ट्रांत पुढारी ह्मणून नांव मिळविण्याचा ज्याला निसर्गसिद्ध हक्क आहे, व जेथली भूमि ह्मणजे साऱ्या पृथ्वीला ज्ञान पुरविणारी खाण व्हावी तेंच राष्ट्र सांप्रत गुलामांचें राष्ट्र व ती भूमि मूर्खपणाची जन्मदात्री या सोज्ज्वळ नांवांनीं प्रसिद्ध होऊन राहिली असती काय ?

'तर मग प्रत्येक मनुष्यानें केवळ स्वतःच्या कल्याणापुरताच विचार करावा, समूहाच्या हिताकरितां व्यक्तीनें आपलें हित बुडवूं नये, स्वार्थत्याग करूं नये, असाच तुमच्या ह्मणण्याचा भावार्थ झाला. ह्मणजे तुमच्या दृष्टीनें स्वार्थत्याग हा एक मोठा दुर्गुणच आहे असें ह्मणावयाचें, असें कोणी ह्मणेल. तर त्यावर माझें उत्तर असें आहे, कीं, महाराज, आपणास स्वार्थत्याग या शब्दाचा अर्थच कळला नाहीं! साबणानें कितीहि घांशित बसलें तरी गाढवाचें घोडें होत नाहीं हें आपणास माहीत असेलच. एखाद्या भिक्षेकऱ्यानें काटकसरीनें वागतों असें ह्मणणें, किंवा दुष्काळ-ग्रस्तानें एकादशीव्रताचें पुण्य संपादन करूं पाहणें, अथवा एखादी वस्तु चोरीस गेल्यावर 'कृष्णार्पण' ह्मणणें, या गोष्टीहि आपण स्वार्थत्याग या सदरांत घालण्यास कांकूं करणार नाहीं असें दिसतें. ज्यांचा सारा जन्म गुलामगिरींत गेला, ज्यांना आपण मनुष्यें आहों कीं दुसरे कोणी प्राणी आहों याचेंहि भान नाहींसें झालें, दुसऱ्यांच्या लाथा खाण्यांतच ज्यांनां जन्माचें सार्थक वाटतें, आपण दुसऱ्यांच्या ओंजळीनें पाणी पितों असें ह्मणणें हेंच ज्यांनां भूषण वाटतें, असल्या मानवजातिकलंकांनीं स्वार्थत्याग हा नुसता शब्दहि तोंडानें उच्चारूं नये! लोकांनीं जबरदस्तीनें कोणतीहि

गोष्ट तुमच्याकडून करवावी आणि तुह्मीं ती आपली माणुसकी विसरून करावी व नंतर तीस स्वार्थत्याग ह्मणावें हाच तुमच्या सध्याच्या स्वार्थत्यागाचा खरा अर्थ ! अशा रीतीनें चालून ऐहिक व पारलौकिक स्वातंत्र्य मिळवूं पाहणारे तुमच्यासारखे शहाणे साऱ्या जगांत तुह्मीच. ज्या बुद्धानें साऱ्या जगाच्या कल्याणाकरितां राज्यावर लाथ मारली, स्वत्व बुडवून टाकलें, स्वार्थत्यागाचा कळस केला, त्याच्याच जोडीस बसण्याची आपली योग्यता एकंदरीनें तुह्मी ठरवूं पहाणार. अहाहा ! तुमच्या सुंदर चालीरीती पाहून तर तुमच्यावरून लिंबलोणच करावेंसें वाटतें. विधवांनां जबरदस्तीनें संन्यास देऊन शिष्यापेक्षां शंकराचार्यच जास्त बनविण्याचा कारखाना काढल्यावर ज्ञानास काय वाण ! पैशास खंडीभर ज्ञान ! लहान लहान पोरांचीं हाडें भरडून स्वार्थत्यागी मनुष्यें उत्पन्न करणाऱ्या गिरण्या सुरू केल्यावर सारेच कर्णाचे अवतार निपजणार ! मग हिंदुस्थानांत सारेच दाते आणि घ्यायला कोणीच नाहीं असा दिवस लवकरच खचित उगवणार ! हर हर ! कोण दशा ही ! 'स्वार्थत्याग करावा' असें ब्राह्मणांनीं शिकवायचें. पण तो खरा स्वार्थत्याग मात्र हलक्या जातींनीं केला पाहिजे, आणि आपली सारी चीजवस्त नाशवंत ह्मणून ब्राह्मणांच्या स्वाधीन केली पाहिजे ! ज्यांनीं सारा जन्म कंदमुळें भक्षून ज्ञानसंचय करावा व लोककल्याणार्थ जगांत संचार करावा असे ते खरे स्वार्थत्यागी व स्वतंत्र वृत्तीचे पुण्यशील महात्मे कोणीकडे, आणि वीतभर खळगींत कांटे भरण्याकरितां गुलामगिरींत पुढें सरसावण्याकरितां अहमहमिका करणारे सांप्रतचे भिकारी कोणीकडे !

साऱ्या समाजाचें कल्याण करण्याच्या प्रयत्नापेक्षां केवळ एकाच मनुष्यास हाताशीं धरून त्याचें कल्याण तुह्मीं केलें तर प्रत्यक्ष कार्यास केवढा जोर येणार आहे बरें ! साऱ्या जगाला गवसणी घालण्याच्या नादीं लागूं नका. निदान एका तरी दीन बांधवाचें खरें कल्याण करीन एवढीच बुद्धि सांप्रत तुह्मां ब्राह्मणांपैकीं प्रत्येकास होईल तर भावी उदयास आजच प्रारंभ झाला असें मी समजेन. प्रथम मोठेपणा प्राप्त होऊं द्या, मग लीनतेची शोभा आहे. आधीं श्रीमंत व्हा, मग लक्ष्मी चंचल ह्मणून पाहिजे

तर तिचा त्याग करा ह्मणजे त्या त्यागास कांहीं महत्त्व येईल. आधीं आशाजनक परिस्थिति प्राप्त करून घ्या, मग वैराग्याचें खरें तेज फांकेल.

माते ! अशी उदास आणि कष्टी होऊं नकोस. असाच चोहोंकडून कोंडमारा झाल्याशिवाय कर्तव्यजागृति होत नसते. डोक्यावर मारल्याशिवाय साप फडा करित नाहीं. तेव्हां सांप्रतची अत्यंत निराशाजनक परिस्थिति ही भावी परिस्थितीची जननी आहे हें विसरूं नको. केवळ बिछान्यावरच लोळून आणि पाटावरून ताटावर उड्या मारून कोणीहि मोठा झाला नाहीं. निराशेची निशा अत्यंत कृष्णवर्ण झाली ह्मणजेच खऱ्या ब्राह्मण्याची प्रभात लवकरच होणार ह्मणून समजावें.

आपला सदैव हितेच्छु,

विवेकानंद.